




# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३१३ ■ शनिवार १५ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26



**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुणांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार दि.१७ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु. संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८


## सरकारला अठ्ठावीस ऑगस्ट पर्यंत अल्टिमेटम
## चूक सुधारा नाहीतर सोडणार नाही : मनोज जरांगे




**जालना, दि. १४ : मराठा आरक्षणाच्या नोंदी आणि प्रमाणपत्रांच्या मुद्यावरून राज्य सरकारला आणि बावनकुळेंना मनोज जरांगे यांनी इशारा दिला आहे. तुम्ही केलेली चूक २८ ऑगस्टच्या आत पत्र देऊन दुरुस्त करा. जी प्रमाणपत्रे रद्द केली आहेत, ती पुन्हा वैध करा आणि समाजाला द्या, आमचे काहीही म्हणणे असणार नाही. मात्र, जर ही चूक सुधारली नाही, तर पुन्हा मी तुम्हाला सोडणार नाही, असा सक्त इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे.**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच माध्यमांशी बोलताना आपली कौटुंबिक पार्श्वभूमी सांगत अत्यंत भावुक प्रतिक्रिया दिली होती. बावनकुळेंच्या या भावुक व्हीडीओवर आता मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आपली सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकारांशी संवाद साधताना मनोज जरांगे म्हणाले, मला पत्रकारांनी सांगितले की चंद्रशेखर बावनकुळे माध्यमांसमोर बोलताना भावुक झाले आणि त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. रात्री मी त्यांचा तो व्हिडीओ पाहिला. त्यांनी त्यात त्यांच्या आईचा उल्लेख केला. तसेच, आपण मराठ्यांच्या विरोधात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मी माझ्या मराठा समाजावर खूप प्रेम करतो. मराठा समाजाच्या विरोधात जर कुणी मराठा आला तरी मी त्याला सोडत नाही. मग दुसरा कुणी आला तर त्याला सोडण्याचा प्रश्नच येत नाही. पण, तुम्ही व्हीडीओत आईचे नाव घेतले आणि तुम्ही व्यथित झालात, हे पाहून मलाही वाईट वाटले. आम्ही मराठे आहोत. आम्ही एकदा-दोनदा माफ करून सोडून देतो. त्यामुळे मी तुम्हाला यावेळी माफ करतो आणि इथून पुढे तुमच्यावर कोणतेही व्यंग करणार नाही.

**तर....रडण्याची वेळ**

बावनकुळेंना माफ करत असतानाच जरांगे पाटलांनी त्यांच्यावर राजकीय निशाणाही साधला. ते म्हणाले, तुम्ही इतके रडकुंडीला आलात. कारण तुम्ही मराठ्यांच्या नादी लागलात. मला तुमच्याबद्दल इतके बोलण्याची गरज नव्हती. पण तुम्ही मोठी चूक केलीत. परळीच्या टोळीच्या नादी लागून आणि त्यांचे ऐकून तुम्ही मराठ्यांच्या लेकरांचे वाटोळे केले. म्हणूनच तुमच्यावर आज ही रडकुंडीची वेळ आली आहे. त्यामुळे इथून पुढे तरी तुम्ही त्यांचे ऐकणे बंद करा, असेही जरांगे म्हणाले.




## उत्तराखंड-चमोली बोगदा दुर्घटनेत सात जण ठार

चमोली, दि. १४ : उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील पीपलकोटी येथे बोगद्यात झालेल्या अपघातानंतर पंधरा तासांपासून बचाव पथके शोधकार्यात गुंतलेली आहेत. या अपघातात सात लोकांचा मृत्यू झाला आहे, तर तीन लोक अजूनही बोगद्यात (पान ८ वर)

## पोलीस,अग्निशमन ३०१ जवानांना शौर्य पदके
## ब्यानव्व जणांना राष्ट्रपती विशिष्ट सेवापदके जाहीर

**नवी दिल्ली, दि. १४ : स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पोलीस, अग्निशमन दल, नागरी संरक्षण, होमगार्ड आणि कारागृह सेवांमधील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जवानांना शौर्य व सेवा पदके जाहीर केली आहेत. यंदा एकूण एक हजार ५७ जवानांना विविध पदकांनी सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये ३०१ शौर्य पदके, ९२ राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदके आणि ६६४ गुणवत्तापूर्ण सेवा पदकांचा समावेश आहे.**

एकूण ३०१ शौर्य पदकांपैकी २७१ पदके पोलीस कर्मचाऱ्यांना, तर २९ पदके अग्निशमन दलाच्या जवानांना देण्यात आली आहेत. विशेष म्हणजे यापैकी १९७ जवान नक्षलवादाने प्रभावित भागात तैनात असताना दाखवलेल्या शौर्यासाठी सन्मानित झाले आहेत. याशिवाय जम्मू-काश्मीरमधील, ईशान्य भारतातील ५१ आणि देशातील इतर भागांतील १२ जवानांचाही शौर्य पदकाने गौरव करण्यात आला आहे. प्राण वाचवणे, मालमत्तेचे संरक्षण करणे, गुन्हेगारी रोखणे तसेच गुन्हेगारांना पकडताना असाधारण धैर्य आणि शौर्य दाखवणाऱ्या जवानांना ही पदके प्रदान केली जातात.

**राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक**

असाधारण आणि उत्कृष्ट सेवेसाठी ९२ जवानांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये पोलीस सेवेतील ८४, अग्निशमन सेवेतील ४, नागरी संरक्षण व होमगार्डमधील १८, तर सुधार सेवेमधील १२ जवानांचा समावेश आहे. तसेच कर्तव्यनिष्ठा आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ६६४ जवानांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक देण्यात येणार आहे. यामध्ये पोलीस सेवेतील ६०६, अग्निशमन सेवेतील २८, नागरी संरक्षण व होमगार्डमधील १८ आणि सुधार सेवेमधील १२ जवानांचा समावेश आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांचाही गौरव केंद्रीय अन्वेषण विभागातील २१ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यापैकी सहा जणांना विशिष्ट सेवा पदके, तर १५ जणांना गुणवत्तापुर्ण सेवापदके प्रदान करण्यात आले आहे. राष्ट्रपती विशेषसेवा पदके मिळालेल्यांमध्ये (पान ८ वर)

## धुळे, शिरपूर, साक्री पोलीस ठाण्यांसाठी आजपासून दामिनी पथकांची स्थापना

**धुळे, दि.१४ - महिलांवर होणारे अत्याचार, छेडछाड आणि कौटुंबिक किंवा सार्वजनिक ठिकाणच्या हिंसाचाराला आळा घालण्यासाठी दि. १५ ऑगस्ट पासुन धुळे जिल्हा पोलीस दल मार्फत धुळे शहर, शिरपूर शहर व साक्री पोलीस ठाणे येथे दामिनी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र पोलीसांच्या दामिनी पथकाचा मुख्य उद्देश महिला आणि बालकांची सुरक्षा सुनिश्चित करणे हा आहे. दामिनी पथक हे महिलांच्या सुरक्षेसाठीचे एक अत्यंत प्रभावी ढाल असून, समाजात महिलांना मुक्तपणे आणि निर्भयपणे जगता यावे, यासाठी पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या संकल्पनेतुन दामिनी पथकांची स्थापना करण्यात येत आहे. पथकात महिला पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा समावेश असेल. त्यामुळे पिडीत महिला किंवा मुली निसंकोचपणे आपल्या तक्रारी व अडचणी थेट मांडु शकतील. सार्वजनिक ठिकाणी, शाळा-कॉलेज बाहेर किंवा कामाच्या ठिकाणी दामिनी पथकाची गस्त होणार असल्यामुळे महिला व मुलींना (पान ८ वर)

## गांजा शेतीवर छापा ४८० किलो गांजा जप्त

शिरपूर दि.१४(का. प्र.) : तालुक्यातील अतिदुर्गम टिटवापाणी परिसरात वनजमिनीवर बेकायदा गांजा लागवड केल्याप्रकरणी तालुका पोलिसांनी दोन ठिकाणी छापा टाकून सुमारे ४८० किलो वजनाचा गांजासदृश अंमली पदार्थ जप्त केला. त्याची किंमत सुमारे २४ लाख रुपये आहे. या कारवाईनंतर दोन्ही संशयित आरोपी शेतातून पसार झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ ऑगस्ट रोजी शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे टिटवापाणी परिसरातील वनविभागाच्या जमिनीवर कारवाई करण्यात आली. (पान ८ वर)

## कपाट दुरुस्तीच्या बहाण्याने चोरी एलसीबीने केले दोघांना जेरबंद

**धुळे, दि.१४- कुलूप व कपाटाचे लॉक दुरुस्तीच्या बहाण्याने चोरी करणारे दोघांना स्थानिक गुन्हे शाखा, धुळे पोलीस पथकाने अटक केली. संशयितांनी दिवसा केलेल्या चोरीच्या गुन्हयाची उकल केली.**

अंजनविहरे (ता. शिंदखेडा) येथील दत्तु लोटन पाटील यांच्या पत्नी घरी असतांना गावात कुलूपाची चावी बनविणारे अनोळखी व्यक्ती नऊ जुलैस दुपारी साडेतीनच्या सुमारास आले. त्यांनी घरातील कपाटाचे लॉक दुरुस्तीचा बहाणा केला. लॉक दुरुस्ती करतांना कपाटात ठेवलेले सोने-चांदीचे दागिने चोरुन नेले. याप्रकरणी दोंडाईचा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपास सुरू होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना नंदुरबार येथील संशयीत विधी संघर्षग्रस्त बालक याने त्याचा अन्य साथीदारासह चोरी केल्याचे माहिती मिळाली. चोरट्यांचा तपासासाठी पोलीस पथक रवाना केले.

पथकाने दोंडाईचा शहरातील नंदुरबार चौफुली (पान ८ वर)

## पो.नि.विनोद पाटील यांना राष्ट्रपती पदक

धुळे, दि. १४ (प्रतिनिधी) : स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह मंत्रालयाने २०२६ साठी धुळयातील



विनोद प्रभाकर पाटील यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर केले आहे. त्याबद्दल पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आप्तेष्टांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. विनोद पाटील यांनी त्यांच्या आजवरच्या ३६ वर्षांच्या सेवेत १६३ बक्षिसे, सोळा प्रशस्तीपत्रे आणि पोलिस महासंचालक पदक मिळविले आहे.धुळ्यात पोलिस मुख्यालयात (पान ८ वर)

## मतदारांनी १७ ऑगस्टपर्यंत गणना प्रपत्र भरून जमा करण्याचे आवाहन

धुळे, दि.१४- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम राबविण्यात येत असून, धुळे शहर विधानसभा

मतदारसंघातील ज्या मतदारांनी अद्याप गणना प्रपत्र भरून संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे जमा केलेले नाही, त्यांनी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत ते भरून सादर करावे, असे आवाहन धुळे शहर सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा अपर तहसीलदार वैशाली हिंगे यांनी केले आहे.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदारांच्या घरोघरी भेटी देऊन गणना प्रपत्र भरून घेण्याचे आणि प्राप्त प्रपत्र संकलित करण्याचे काम करीत आहेत. धुळे शहर विधानसभा मतदारसंघात अद्याप ११ हजार २६९ मतदारांचे गणना प्रपत्र प्राप्त होणे बाकी असून, ते पूर्ण करण्यासाठी केवळ दोन दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. तरी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत ज्या मतदारांकडून गणना प्रपत्र प्राप्त (पान ८ वर)

## एल.सी.बी.ने जबरी चोरीसह घरफोडी करणाऱ्या टोळक्याच्या मुसक्या आवळल्या; एक जण गजाआड

**धुळे, दि.१४- धुळे शहरासह विविध ठिकाणी चोरी घरपोडी करणारी चोरट्यांची पाच जणांची टोळी स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने निष्पन्न केली. त्यातील एकाला अटक केली असून अन्य चौघांचा शोध सुरू आहे.**

शहरातील साक्रीरोड अजबेनगरमधील घर क्रमांक येथील फिर्यादी मनोज मोहनलाल शर्मा यांच्या घरातुन तोंडास मास्क लावलेल्या अनोळखी तरुणांनी जबरी चोरी केली. तसेच साक्षीदार संतोष कुंदनमल जैन रा. शांतीनगर धुळे यांचे घराचा कडीकोयंडा तोडुन एकुण २६ हजार ४०० रुपयांचे सोने-चांदीचे दागिने चोरुन नेले. धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांनी समांतर तपास केला. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना गोपनिय माहिती मिळाली. त्यानुसार सुरत येथून गुरुचरणसिंग रणजितसिंग शिकलकर, रा. यशवंतनगर, साक्रीरोड, धुळे यास ताब्यात घेवून सखोल विचारपुस केली. त्याने त्याचे अन्य साथीदार राजेंद्रसिंग ऊर्फ राजुसिंग शिकलीकर रा. चामुंडा नगर, आजवारोड, वडोदरा गुजरात राज्य, अमृतसिंग ऊर्फ आण्णा बबलुसिंग टाक शिकलीकर, रा. बेस्तान, दिंडोली, सुरत, गुजरात, सुनिलसिंग घुंगरुसिंग तिलपितीया रा.ई ब्लॉक-१२/५, बेस्तान, दिंडोली, सुरत, गुजरात, बॉबीसिंग घुंगरुसिंग बेस्तान, दिंडोली, सुरत, गुजरात यांच्यासह अजबेनगर येथे दोन घरात आणि नकाणे रोडवरील शिक्षक कॉलनी या तीन ठिकाणी तसेच अमळनेर जि. जळगाव येथे चोरीची कबुली दिली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शहरात जबरीचोरी व घरफोडी करणाऱ्या पाच जणांची टोळीस निष्पन्न केली. मुख्य आरोपी तथा टोळी प्रमुख गुरुचरणसिंग शिकलकर यास अटक केली. जबरीचोरी व घरफोडीचे असे धुळे शहर, पश्चिम देवपूर, अमळनेर जि. जळगाव येथील चार गुन्हे उघडकीस आणले. उर्वरीत चार आरोपींचा शोध (पान ८ वर)

## प्रतिबंधित गुटखा, तंबाखूचा चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**नंदुरबार, दि.१४ (प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील वडाळी गावातील आशापुरी पान सेंटर येथे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने कारवाई करून मानवी आरोग्यास घातक असलेला प्रतिबंधित गुटखा व तंबाखू असा एकूण चार लाख बारा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.**

अन्न सुरक्षा अधिकारी संकेत आबा सदाफुले यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.३० वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. प्रतिबंधित गुटखा व तंबाखूची विक्रीसाठी वाहतूक, साठवणूक व विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगताना आरोपी आढळून आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी ज्ञानेश्वर देवराम माळी (वय ४२, रा. माऊलीपुरा, बडाळी, ता. जि. नंदुरबार) याच्यासह ओमाराम खंगाराम झंवर (वय ५८, रा. सावित्री...) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि प्रविण सोनवणे करीत आहेत.

## आदिवासी जमीन प्रकरणात वस्तुनिष्ठ अहवाल सादर करा : समाजातील नागरिकांचे निवेदन

**धुळे, दि.१४- मौजे देवपूर, धुळे शहर येथील सर्वे क्रमांक १०७ मधील ८ हेक्टर ५६ आर क्षेत्राच्या आदिवासी जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहाराची निष्पक्ष व कायदेशीर चौकशी करून विभागीय आयुक्त, नाशिक यांनी मागविलेला परिपूर्ण अहवाल वस्तुनिष्ठ पद्धतीने सादर करावा, अशी मागणी आदिवासी समाजातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते**



**यांनी अपर जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनानुसार, या जमिनीचे मूळ मालक भुऱ्या फकिरा भिल यांनी २९ जून १९८१ रोजी विक्री परवानगीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज केला होता. त्यानंतर सुमारे वर्षांनी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी २२ फेब्रुवारी २००५ रोजीच्या आदेशाद्वारे आदिवासी धारक भुऱ्या फकिरा भिल यांचे वारस हिरामन भुऱ्या भिल यांच्याकडून बिगर आदिवासी विठ्ठल सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने मुख्य प्रवर्तक विठ्ठल झिपरू पाटील यांच्या नावे खरेदी-विक्रीस परवानगी दिली. त्यानंतर ७ मार्च २००७ रोजी दस्त क्रमांक ११०५/२००५ अन्वये खरेदीखत नोंदविण्यात आले. मात्र, मूळ आदिवासी जमीनमालक हिरामन भुऱ्या भिल हे खरेदीखताच्या वेळी प्रत्यक्ष उपस्थित नसताना त्यांच्या नावाने पॉवर ऑफ अॅटर्नीचा वापर करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात (पान ८ वर)

## मनपाच्या हर घर तिरंगा अभियानाला प्रतिसाद शाळा-महाविद्यालयांत देशभक्तीपर कार्यक्रम

**धुळे, दि.१४-स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राबविण्यात येत असलेल्या हर घर तिरंगा अभियानास धुळे शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, धुळे महानगरपालिकेमार्फत विविध स्तरांवर देशभक्तीपर उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.**

युवा पिढी आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना दृढ व्हावी तसेच भारताच्या स्वातंत्र्याच्या दैदिप्यमान इतिहासाची उजळणी व्हावी, या उद्देशाने शाळा व महाविद्यालयांमध्ये चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच चित्ररथाच्या माध्यमातून तिरंग्याचा इतिहास, राष्ट्रध्वजाचे महत्त्व आणि वंदे मातरम गीताच्या निर्मितीचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक आयुक्त डॉ. सोनाली देवरे-पगार यांच्या नियोजनातून हे उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत एस.व्ही.के.एम.विद्यालय, जयहिंद सीनियर कॉलेज, पिंपळादेवी माध्यमिक हायस्कूल, रूपाबाई कन्या शाळा आणि राजीव गांधी हायस्कूल येथे चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्ती, तिरंग्याचा गौरव आणि स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान या विषयांवर अत्यंत आकर्षक व कल्पक कलाकृती साकारून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. सोनाली देवरे-पगार यांनी संबंधित (पान ८ वर)


## २२वा स्मृतीदिन



**अभिनिवेश (भैय्या) खैरनार**

(जन्म : १३ ऑगस्ट १९६८)
(निर्वाण : १६ ऑगस्ट २००४)

तुमचं असणं सर्वकाही होतं.
आयुष्यातील एक ते सुंदर पर्व होतं.
आज सर्वकाही असल्याची जाणीव आहे
पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे

- शोकाकुल परिवार-

श्रीमती ज्योत्स्ना जगन्नाथ खैरनार (आई)

डॉ.जगदीश पाखरे (जिजाजी) — डॉ.सुषमा जगदीश पाखरे (बहीण)
डॉ.राहुल खैरे (जिजाजी) — डॉ.शुभदा राहुल खैरे (बहीण)
वंदनाराणी (बहीण) — प्रिया फर्नांडिस (बहीण)
डॉ.किमया पाखरे (भाची) — चि.शमा अभिनिवेश खैरनार (कन्या)


## शिवसेना उबाठाच्या बैठकीचे आयोजन

धुळे, दि.१४- शिवसेना उबाठाच्या प्रमुख पदाधिकारी यांची बैठक दि.१६ ऑगस्ट रोजी दुपारी १.३०वाजता मार्केट कमेटीच्या हॉलमध्ये व पिंपळनेर तालुक्याची दुपारी ४.३० वाजता पिंपळनेर शासकीय विश्रामगृह येथे होणार आहे. शिवसेना संपर्क प्रमुख व माजी आ.अशोक धात्रक, माजी आ.अनिल गोटे, शिवसेना जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, जिल्हा संघटक प्रशांत भदाणे, नवनियुक्त साक्री विधानसभा संपर्क प्रमुख संजय गुजर, जिल्हा समन्वयक किशोर वाघ आदी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

## उद्या अंक बंद

दै.आपला महाराष्ट्र कार्यालयास स्वातंत्र्य दिना निमित्त आज सुटी असल्याने उद्या शनिवार दि.१६ ऑगस्ट २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद घ्यावी. -संपादक


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,38,800 रु.+3% GST
सोने- 24 K -1,51,500 रु.+3% GST
चांदी- 2,35,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३





आपला महाराष्ट्र

# आ चंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

भारतीय स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण झाली. आज ८० वा वर्धापन दिन आहे. त्यानिमित्त आमच्या तमाम वाचकांना, हितचिंतकांना, जाहिरातदारांना, आणि कर्मचाऱ्यांना हार्दिक शुभेच्छा. गांधीजींनी माझ्या स्वप्नांचा भारत या आलेखात असे म्हटले आहे की, मला स्वातंत्र्य यासाठी नको आहे की माझा एवढा मोठा देश, जो जगातील लोकसंख्येचा पाचवा हिस्सा आहे तो जगातील कोणत्याही जातीचे अथवा व्यक्तीचे शोषण करेल तर मी आपल्या देशाला असा अनर्थ करू देणार नाही. जर मी माझ्या देशासाठी स्वातंत्र्य चाहत असेल तर मी असेही मानले पाहिजे की सबल आणि दुर्बलांना सारखाच अधिकार आहे. जर मला तसे मान्य नसेल व माझी तशी इच्छा नसेल तर मी स्वत:ला पात्र नाही असे समजावे. माझ्या आकांक्षाचे लक्ष स्वातंत्र्यापेक्षा जास्त उंचीचे आहे. भारताच्या मुक्तीच्या अनुषंगाने मी पाश्चिमात्य देश करीत असलेल्या शोषणातून अनेक दुर्बल देशांना मुक्त करू इच्छितो. त्यांचा उद्धार करू इच्छितो. गांधीजींचे हे विचार त्या काळात लागू होते तसे आजही लागू आहेत. आज स्वातंत्र्यानंतर ७९ वर्षांनी जरी परकियां कडून आपले शोषण होत नसले तरी आजची राजकीय व्यवस्थाच देशाला खिळ खिळे करून टाकत आहे. विषमतेचे बीज येथे पेरले जात आहे. एखाद्या दुसऱ्या भांडवलदारासाठी खुद्द सरकारच जीव टाकते असे कधीही या देशाने बघितलेले नाही. परिणामी गरीब अधिक गरीब होत जाईल आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाईल अशी इथली अवस्था आहे. गरिबांना लाचार करून त्यांचा आवाज बंद करून टाकणे आणि त्यांच्यावर तसेच अल्पसंख्याकांवर दहशत निर्माण करणे असा कार्यक्रम सध्या आपल्या देशात राबविला जात असल्याने आणीबाणी पेक्षाही वाईट अवस्था आहे. परिणामी देशाची लोकशाही आणि स्वातंत्र्य धोक्यात येऊ पाहत आहे. कितीही घराघरांवर तिरंगा फडकविला तरी जनतेच्या मनात भीती आहे. अस्वस्थता आहे. ती केवळ तिरंगा लावून जाणार नाही. तिरंगा देखील जाहीरपणे एखाद्या राजकीय पक्षाच्या रॅली काढून वाटप केले जात आहेत. म्हणजे आवाहन करूनही नागरिक तिरंगा लावायला तयार नाहीत. त्यामुळे पक्षामार्फत मिरवणुका काढणे आणि तिरंगा यात्रा, तिरंगा वाटप कार्यक्रम राबविणे ही काही निकोप लोकशाहीवादी आणि राष्ट्रभिमान असलेल्या देशाची व्याख्या होऊ शकत नाही.

राष्ट्रध्वजाचा केवळ अपमानच नव्हे तर त्याचा कचरा करून टाकण्यात आलेला आहे. जी काही आचारसंहिता होती त्यात बदल करून ग्रामोद्योगाचे प्रतिक असलेल्या खादीचे ध्वज दिसणार नाहीत अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. व्यापाऱ्यांना किंवा भांडवलदारांना राष्ट्रध्वजा मधून कमाई होईल असे हे षडयंत्र असून त्यातून देशभक्तीचा आव आणला जात आहे. आपले राज्य आणि देश कल्याणकारी आहे. हे मान्य करूनही लाचारांच्या फौजा मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्याचे काम होत आहे. फुकट अन्नधान्य असेल, लाडकी बहिणीच्या योजना असतील, अशा पद्धतीच्या अनेक योजनांच्या माध्यमातून खिरापत वाटण्याचे काम महाराष्ट्रात आणि देशात जोरदारपणे सुरू आहे. त्याद्वारे सत्ता प्रस्थापित करणे आणि आपले इप्सित साध्य करून घेणे असे आंतरजाल आहे. ते लोकांना कळत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल. दोन स्वपक्षीय आमदारांच्या इच्छेनुसार महाराष्ट्र सरकारने भारतरत्न विनोबांच्या संकल्पनेतील ग्रामदान कायदा निरस्त करण्याचा घाट घातला आहे. या गावांमध्ये ग्रामपंचायत पुढच्या काळात राज्य करेल. सर्व जमिनी ग्रामपंचायतच्या मालकीच्या होतील. ठिकठिकाणी भू माफिया हजर आहेत. त्यांच्याशी संगनमत करून या आमदारानी हा कायदा संपविण्याचा चंग बांधला आहे. त्यांच्याच पक्षाचे सरकार असल्यामुळे सरकारने विनोबांच्या या संकल्पनेचा घास घेण्याचे ठरविलेले आहे. हा कायदा रद्द झाल्यानंतर महाराष्ट्र २० गावे, ग्रामपंचायतच्या अखत्यारीत जातील. तिथे निवडणूका होतील. लोक भूमीहीन होतील. मारामाऱ्या होतील. आणखी काही होईल. पर्यायाने जे सगळीकडे चालू आहे त्यातून राजकीय आणि सामाजिक अराजक निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे. महाराष्ट्रातील एकूण गावांपैकी फक्त वीस गावे स्वायत्त आणि स्वावलंबी, जमिनीची मालकी ग्राम मंडळाकडे असलेली आहेत. इथे निवडणुका होत नाहीत. विशेष म्हणजे गावाच्या बाहेरच्या इसमाला जमीन विकता येत नाही. त्यामुळे हा कायदा लागू झाल्यापासून वीस गावातील शेतकरी जमीन मालक आहेत. उद्या ते राहणारच नाहीत. ते कफल्लक होतील आणि मग लाचार होतील. अशीच व्यवस्था आजच्या राजकीय व्यवस्थेला अभिप्रेत आहे. ती लोकशाहीवादी नाही त्यामुळे स्वातंत्र्या चा उपभोग नेमके कोण घेत आहे हा प्रश्न उपस्थित होतो.

मोठ्या मेहनतीने देशाला स्वातंत्र्य मिळाले. ते अबाधित ठेवण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेची निर्मिती केली. त्यातील मूलभूत तत्वे पायदळी तुडविण्याची एकही संधी विद्यमान राजकीय व्यवस्था सोडत नाही. ज्यांची जबाबदारी आहे ते विद्यार्थ्यांवर केलेल्या अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या विरोधी पक्षाच्या सामोरे जात नाहीत. सभागृहात येत नाहीत. ही निकोप लोकशाहीची लक्षणे असू शकत नाहीत तर ती खुल्लम खुल्ला अराजकतेची लक्षणे आहेत. जाती–जातीत आणि धर्माधर्मात तेढ निर्माण करणारी भूमिका सरकारची आहे. ही बाब पूर्णपणे स्वातंत्र्य आणि स्वराज्य या संकल्पनेला छेद देणारी आहे. जे मुद्दे दैनंदिन जीवनाशी संबंधित नाहीत ते चर्चेत आणून देशातील आणि राज्यातील वातावरण दूषित करण्याचे काम राज्यकर्ते आणि त्यांचे अंधभक्त मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. धार्मिक ध्रुवीकरण आणि जातीय तणावाचे समर्थन सातत्याने केले जाते. देशातील जे मूलभूत प्रश्न आहेत त्यावर कोणी भाष्य करीत नाही. त्याचे परिणाम तरुणाईने निर्माण केलेल्या शांततामय संघर्षात आहे. परंतु त्यांचे दमन केले जाते. त्याबाबत प्रश्न उपस्थित करणाऱ्या विरोधकांना दुर्लक्षित केले जाते. दमनाच्या घटनेला जबाबदार असलेले नेते सभागृहात येत नाहीत. ही अगदी लांच्छनास्पद बाब असून. याबद्दल लोकांच्या मनात प्रचंड नाराजी आहे. बेरोजगारी महागाई, आरोग्य, शिक्षण क्षेत्रातील सुधारणा, महिलांची सुरक्षा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मध्यमवर्गीयांचे मुश्किल झालेले जगणे, शेतीचे अनंत प्रश्न. यावर कोणीच बोलायला तयार नाही. लाचार करण्याचे मायावी जाळे पसरवून लोकांना संमोहनात टाकले जात आहे. त्यामुळे देशातील जी बिघडलेली परिस्थिती आहे त्याबद्दल कोणालाच काही कळू द्यायचे नाही. अशीच आखणी करण्यात आलेली दिसते. गेल्या १२–१३ वर्षांपासून देशातील परिस्थिती पार कोलमडून पडलेली आहे. विकास झाला परंतु तो निवडक काही टक्के लोकांसाठीच झाला असे म्हणणे भाग आहे . विमानतळे, आकाशातील विमाने, वंदे भारत रेल्वे, शताब्दी एक्सप्रेस, समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, या पंचतारांकित विकासाशी देशातील ८० कोटी लोक, की ज्यांना सरकार फुकट धान्य वाटते त्यांचा काहीच संबंध नाही. मग हे स्वातंत्र्य कोणासाठी आहे हा प्रश्न स्वाभाविकच उपस्थित होतो. त्याचे उत्तर ते स्वातंत्र्य मूठभर लोकांसाठी आहे असे म्हणणे भाग आहे. या परिस्थितीतून आपल्या राज्याला आणि देशाला बाहेर काढायचे असेल तर संविधानाची बूज राखली गेली पाहिजे. तरच आपल्याला हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे, आ चंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे असे मोकळेपणाने म्हणता येईल.

## दहिवेलला माळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव होणार

साक्री, दि.१४ (प्रतिनिधी)- अखिल भारतीय माळी महासंघाच्या वतीने साक्री तालुक्यातील माळी समाजातील गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या समाजबांधवांचा गुणगौरव व सन्मान सोहळा २३ ऑगस्ट रोजी दहिवेल येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी साक्री येथील विश्रामगृहात समता परीषदेचे जिल्हाध्यक्ष राजेश बागुल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते सुभाष जगताप, दिगंबर क्षीरसागर, माधवराव पाटील, कन्हैयालाल माळी, बाबूलाल गवळी, माजी सरपंच नवल खैरनार, माजी प्राचार्य रमेश गवळी, पंकज सोनवणे, संदीप पाटील, प्रभाकर घरटे, धनंजय घरटे, भगवान गवळी, प्रा. पंकज अहिरे, रवी खैरनार, अमोल क्षीरसागर, तुषार माळी आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करून नियमांची अंमलबजावणी करण्याची मागणी

**शहादा,दि.१४ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन शाळकरी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबवून शासनाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबत मनसेचे शहादा शहराध्यक्ष सुहास (दादू) देविदास पाटील, मनविसेचे जिल्हा सचिव शशी राजपूत यांच्या कडून गट शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.**



या निवेदनात म्हटले आहे की, शहादा शहरातील डोंगरगाव व मोहिदा रस्त्यालगत शाळांमध्ये विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी ऑटो-रिक्षा, मिनी बस व इतर वाहनांचा वापर केला जातो. मात्र अनेक वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक, वाहनाचा फिटनेस प्रमाणपत्र, विमा, प्रदूषण प्रमाणपत्र आदी बाबींची पूर्तता केली जाते का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित नियमांचे पालन होत नसल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी करण्यात आली.

तसेच महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम, केंद्रीय मोटार वाहन नियम, महाराष्ट्र मोटार वाहन नियम तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसंदर्भातील शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांनुसार वाहनांची तपासणी करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

मनसेने प्रशासनाकडे पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यात शाळकरी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तातडीने विशेष तपासणी करावी, शिक्षण विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकाद्वारे नियमित तपासणी मोहीम राबवावी. विनापरवाना, विनाफिटनेस, विमा किंवा आवश्यक कागदपत्रांशिवाय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी. क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी. प्रत्येक शाळेत शालेय वाहतूक सुरक्षा समिती कार्यरत असल्याची खात्री करावी. शाळांनी सर्व नियमांची पूर्तता करणाऱ्या वाहनांनाच विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी परवानगी द्यावी. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी वाहनांमध्ये आवश्यक सुरक्षा साधने, अग्निशामक यंत्र, प्रथमोपचार पेटी आदींची पूर्तता असल्याची खात्री करावी. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड होऊ नये. प्रशासनाने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी मनसेच्यावतीने करण्यात आली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** मौजे तिखी ता. जि. धुळे येथील धुळे गट क्रमांक व उपविभाग ११०/२ चे क्षेत्र ०२ हे. ६४ आर. व पो. ख. ०२ हे. ६६ आर असे एकूण क्षेत्र ०५ हे. ३० आर चा आकार २ रु. १५ पैसे अश्या वर्णनाची जिरायत शेत जमीन मिळकत यास जुन्या वहिवाटी प्रमाणे कायमस्वरुपी वापर रस्ता आहे व राहील.

यासी चतु:सिमा
पुर्वेस : तिखी –डेडरगांव रस्ता
पश्चिमेस: धुळे –मोघण रस्ता
दक्षिणेस : गट क्र. १२२/१
उत्तरेस : अन्वर नाला

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील मिळकत ही श्री.राजेंद्र वालचंद शिंदे रा. मोहाडी धुळे ता. जि. धुळे यांच्या मालकीच्या व ताबे उपभोगातील असून यांच्याकडून सदर मिळकती या आमचे अशिल यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदा पोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत तक्रार न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज, निर्वेध व श्री.राजेंद्र वालचंद शिंदे रा. मोहाडी धुळे ता. जि. धुळे यांच्या मालकीच्या व ताबे उपभोगातील असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १४/०८/२०२६

**ॲड. ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला
बिल्डींग जवळ, मिल परिसर, धुळे
**मो. ९४२२७७१२७४**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** मौजे वारकुंडाणे ता. जि. धुळे येथील धुळे गट नं. १९३ पैकी प्लॉट नं ३२७ चे एकूण क्षेत्र ३७० चौ. मी. व बखळ प्लॉट अशी मिळकत

यासी चतु:सिमा
पुर्वेस : रस्ता
पश्चिमेस : गट नं. ३२६
दक्षिणेस : प्लॉट नं. ३२८
उत्तरेस : रस्ता

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील मिळकत ही १) भास्कर उत्तम राठोड, २) सुधाकर उत्तम राठोड, ३) प्रल्हाद उत्तम राठोड, ४) छोटु उत्तम राठोड सर्व रा. अक्कलपाडा ता. साक्री जि. धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून यांच्याकडून सदर मिळकत ही आमचे अशिल श्री. विशाल भरत पाटील रा. धुळे यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदा पोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत तक्रार न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज, निर्वेध व वरील नमूद मालकांच्या संयुक्त मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १४/०८/२०२६

**ॲड. ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला
बिल्डींग जवळ, मिल परिसर, धुळे
**मो. ९४२२७७१२७४**

### NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**ASHFAQUE AHEMAD A.HAMID SHAIKH**
MY NEW NAME IS
**ASHFAQUE SHAIKH HAMID**
ADD- ZAMI CHOUK, KASALI MOHALLA, AMALNER DIST.JALGAON-425401

### NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**SUFIYA BANO AASIF IQBAL**
MY NEW NAME IS
**SUFIYA BANO AASIF IQBAL ANSARI**
ADD- MUSLIM NAGAR NATIONAL URDU HIGH SCHOOL, DHULE-424001

### NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**AASIF IQBAL ABDUL QAYYUM**
MY NEW NAME IS
**AASIF IQBAL ABDUL KAYYUM ANSARI**
ADD- MUSLIM NAGAR NATIONAL URDU HIGH SCHOOL, DHULE-424001

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महिंदळे येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. ७६/१/ब/३ यातील प्लॉट नं. १० चे एकूण क्षेत्र १७०.५० चौ. मी. यापैकी दक्षिणेकडील निम्मा भाग क्षेत्र ८५.२५ चौ. मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता ६ मी., पश्चिमेस : प्लॉट नं. ५, दक्षिणेस : प्लॉट नं. ९, उत्तरेस : याच प्लॉट नं. १० चा उर्वरित भाग.

येणे प्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील मिळकत बखळ प्लॉट हे श्री. संजय महादू माळी रा. १५ ब, भगवतीनगर, नंदुरबार जि. नंदुरबार यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच सदर मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्यूपत्र, सौदा पावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली आहे.ठिकाण : धुळे दि. १४/०८/२०२६

**ॲड. प्रमोद एम. चौधरी**
११४, गोविंदा अपार्टमेंट, देवपूर,
धुळे मो. ९८६०७०६१७१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मेहेरगांव ता. जि. धुळे येथील गट नं. ३०८/१ हंगामी बागायत शेतजमीनचे क्षेत्र ला. ला. ०२ हे. ५० आर. पो. ख. ०० हे. ३० आर एकूण ०२ हे. ८० आर या गटातील विहीर व विहिरीतील पाण्यावर संपूर्ण मालकी हक्कासह सदर गटात येणे जाणे करीता रस्ता जुन्या वहिवाटी प्रमाणे यासी चतु:सिमा खालील प्रमाणे

पुर्वेस : गट नं. ३०८ पश्चिमेस : गट नं. ३०७
दक्षिणेस : गट नं. ३०९ उत्तरेस : गट नं. ३३५

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत ही श्री. चंद्रकांत जिभाउ धनगर रा. प्लॉट नं. १८, गोंदूर रोड, संत कबीर नगर वलवाडी शिवार ता. जि. धुळे यांच्या मालकी व ताबे व कब्जे उपभोगातील असून सदर मिळकत त्यांनी कायम स्वरुपी खरेदी खतान विकण्याचा तोंडी सौदा आमचे पक्षकारा सोबत केला असून आमचे पक्षकार लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत मा. दुय्यम उपनिबंधक धुळे यांच्या कार्यालयात नोंदविणार आहे.

सबब या जाहीर नोटीसींनी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वर नमूद वर्णनाच्या मिळकतीबाबत वर नमूद मिळकत मालकांशी कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा खरेदी विक्री, तारण, गहाणखत, सौदा, लिज, भाडेकरार, बक्षिसपत्र, जनरल अगर स्पेशल मुखत्यार इ. कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर हरकत व तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या खाली नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रा सहीत लेखी स्वरुपात नोंदव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारचा लेखी हरकती अगर म्हणणे न आल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व निर्बोज असल्याचे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तसेच वर नमूद मुदती नंतर आलेल्या अगर परस्पर वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन घेतलेल्या हरकती आमच्या पश्रकारावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमच्या पक्षकाराने सांगितल्यावरुन आज रोजी आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.. धुळे दि. १४/०८/२०२६

**ॲड.राहुल सुभाष शिकारे**
नोटरी भारत सरकार
१५, रामचंद्र नगर, पारोळा रोड, धुळे मो. ९४२२२१७८६७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
**मौजे महिंदळे येथील कुमार नगर भागातील सि. स. नं. ६९६४ चे क्षेत्र १८.५८ चौ. मी. यात जुने आरसीसी मधील बांधीव दुकान मिळकत बखळ जागेसह, सत्ता प्रकार अ.**

यासी चतु:सिमा :
पुर्वेस : श्री. सुरेश चैनमल मोहनानी यांचा भाग
पश्चिमेस : श्री. चंदरमल चैनमल मोहनानी यांचा भाग
दक्षिणेस : साक्री रोड,
उत्तरेस : सुरेश व चंदरमल मोहनानी यांचे घर

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल **यांनी मिळकतीचे मालक श्री. अमित रामचंद वाघवानी रा. ५ अ, जवाहर नगर, दामिनी ज्वेलर्स मागे, डॉ. जे. के. ठाकरे लाईन, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.**

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी – विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ (पाच) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १४/०८/२०२६


**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

## सी.गो.पाटील महाविद्यालयात ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा


साक्री, दि.१४- विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री येथे भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांची वी जयंती तसेच राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रंथालयाचे बदलत्या डिजिटल युगातील महत्त्व, वाचनसंस्कृती आणि विद्यार्थ्यांनी उपलब्ध ज्ञानस्रोतांचा प्रभावी वापर करण्याची गरज यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आर.आर. अहिरे उपस्थित होते. व्यासपीठावर आयक्यूएसी समन्वयक डॉ. डी.एस. चव्हाण, डॉ. चंद्रकांत कढरे व डॉ. डी.पी. पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रकाश में आज हिंदुस्थानी २




कमल हासन रकुल प्रितसिंग, काजल अग्रवाल सिध्दार्थ एस.जे.सुर्या प्रिया बॉबीसिन्हा

प्रकाश में कल द गोल्ड मेडल





धर्मेंद्र जितेंद्र शत्रुघ्न सिन्हा प्रेमनाथ शेट्टी राखी रेखा बिंदु मधुमती फर्याल केएनसिंग








### शब्दकोडे क्रमांक : २४३२



**आडवे शब्द :** १.इराण जवळील एक सामुद्रधुनीचा प्रदेश ४.नगर ६.दोन दशक मिळून तयार होणारी संख्या ७.भारतातील उत्तराखंड राज्यातील चमोली जिल्ह्यात अलकनंदा नदीच्या काठी वसलेले भगवान विष्णूंचे अत्यंत पवित्र आणि प्राचीन मंदिर ९.किनार १०.अमिताभ बच्चन,धर्मेंद्र यांचा एक सिनेमा ११.वधू-वरच्या लग्नाची मिरवणूक १२.साहस १४.पाठीस आलेला पोक १५.तू-विरुद्ध १६.शुद्ध १७.धातूची तीक्ष्ण चकती १९.आमसूल २१.अंगठ्याच्या विरुद्ध असलेले लहान आकाराचे बोट २३.एखादयास मिश्कीलपणे मारलेला टोमणा २६.नुकसान २८.लग-उलट लिहा २९.विजयादशमी ३०.देवीचा गोंधळ ३१.लोणच्यातील क्षार ३३.काळजी ३४.नवे रूप ३६.पोरके ३९.महाग नसलेले ४०.नाही म्हणणे ४१.भक्ष्य गिळंकृत करणारा एक जीव ४३.गरम ४५.उदर ४६.नववी तिथी ४७.लेंगा ४८.वचनात अडकलेला **उभे शब्द :** १.शिमग्याचा सण २.लहान मुलीचा फ्रॉक ३.हिंदीत -निवडणूक ५.शाश्वती ६.कंटाळा ८.अंगावर रोमांच आणणारा ९.काम १०.दुःख १२.एक प्रसिद्ध शास्त्रीय गायक '*** अभिषेकी १३.दर्जा १४.पत्नी १७.वेड्यांचे इस्पितळ -हिंदीत १८.मुख्य गायकासोबत गाणारा समूह गायकांचा ताफा १९.मासेमारीवर उदर निर्वाह करणारे बांधव २०.जास्त किंमत असलेला २२.वर्ण २४.साडीचा दुमडलेला भाग,पटल २५.नासलेले २७.कमळ ३०.जाळे-हिंदीत ३२. मकर संक्रांति नंतर येणारी एक तिथी ३३.गोंधळ ३५.दोन डोंगरांमधील खोल जागा ३६.अंत ३७.उंच -उंच इमारतींचे निर्माण करणारा ३८.संध्याकाळ ३९.नादमय सूर ४१.कैद ४२.श्रीमंत-विरुद्ध ४३.काकडीचा एक प्रकार ४४.खोटे बोलणे

### शब्दकोडे क्रमांक : २४३१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | र | क | री | | जे | जु | री | | ता | न | सा |
| री | | रा | | ना | र | | या | मि | नी | | म |
| | सु | र | त | | बं | द | | ल | | म | ना |
| द | गा | | ल | वा | द | | ज | न | म | त | |
| | वा | जा | | ट | | तु | ला | | ज | ल | वा |
| प्र | | ग | ट | | प | रा | श | र | | ब | |
| को | क | रू | | दा | री | | य | म | न | | तु |
| प | | क | ब | | वा | म | | मा | ख | न | |
| | खो | | कु | मा | र | | प | ण | | भां | ग |
| व्या | | ज | ळ | ण | | अं | त | | अं | ग | |
| स | क | ल | | दे | शी | | झ | रा | | ण | ग |
| | ब | द | मा | श | | आ | ड | वा | ट | | प |




# लोककल्याणकारी शासन व्यवस्थेचे निर्माते



प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

## विश्वातील महान राजे

छत्रपतींचे स्वराज्य म्हणजे जगातील पहिले लोककल्याणकारी शासन होय. महाराजांनी न्याय आणि सुराज्य या संकल्पनांना सर्वोच्च स्थान दिले. छत्रपतींची शासन व्यवस्था जगात श्रेष्ठ होती. मध्ययुगीन काळात छत्रपतींच्या स्वराज्याची राज्यघटना होती. त्या राज्यघटनेप्रमाणे राज्यकारभार चालत असे. न्यायव्यवस्था हे राज्यघटनेचे ठळक वैशिष्ट्य होते. छत्रपतींनी राज्यघटनेव्दारे उत्कृष्ट प्रशासन व निःपक्षपाती न्यायव्यवस्था निर्माण केली. लोकशाहीवर आधारीत स्वराज्यातील प्रत्येक निर्णय घेतला जात असे. न्यायप्रक्रियेमध्ये कार्यक्षम केले होते. छत्रपती हे एक द्रष्टे शासनकर्ते असल्यामुळे न्यायदानाला सर्वोच्च व श्रेष्ठ स्थान दिले. स्वराज्यातील वरिष्ठ अधिका-यांना जागेवर निकाल देण्याचे अधिकार दिले. त्यांची सर्व धोरणे ही प्रजेच्या कल्याणाशी निगडीत होती. स्वराज्यातील न्यायव्यवस्थेत लोकसत्ता व राजसत्ता अशा दोन प्रभावी सत्ता न्यायदानाचे काम करीत असत.छत्रपती शिवाजी महाराजांचा न्यायविषयक विचाराचा एक विशिष्ट असा आदर्श होता. महाराज आपले मत कोणावरही लादत नसत. न्यायदान पूर्णपणे लोकमतानुसार होत असे. न्यायाचे प्रतीक किंवा न्यायी राज्यकारभाराचे प्रतीक या अथनि सोन्याचा तराजू एका सोन्याच्याच दांडीला अडकवून सिंहासनामागे एक सेवक धरून उभा राही हे चिन्ह फक्त छत्रपतीच वापरीत. न्यायव्यवस्थमध्ये आजही तराजू या प्रतिकाचा वापर केला जातो.

स्वराज्यात न्यायदानासाठी स्वतंत्र असे न्यायधीशपद निर्माण करून इ.स. १६६१ मध्ये निराजी रावजी यांना न्यायखात्याचे प्रमुखपद देण्यात आले.छत्रपतींच्या राज्यभिषेकासमयी निराजी रावजी हेच मुख्य न्यायाधीश होते. परंतु न्यायवस्थेच्या सर्वोच्च



अधिका-यांच्या नेमणूका केल्या जात असत. छत्रपती प्रांता-प्रांतातील न्यायाधिशांच्या नेमणूका गुणवत्ता व पात्रतेनुसार करत असत. न्यायाधिश व पंडितराव यांच्या नेमणूका स्वत: राजे करीत असत. न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च प्रमुख छत्रपतीच होते.त्यामुळे स्वराज्याची न्यायव्यवस्था अत्यंत कार्यक्षम होती. न्यायदान व्यवस्थेसाठी स्वतंत्र कायदे केले होते.त्या कायद्याप्रमाणेच शासन व्यवस्था चालत असे.

स्वराज्यातील न्याय धोरण ठरवत असताना नियम व कायदे विचारात घेतले जात असत. प्रत्येक घटकाला महत्व देऊन त्यांचा न्याय पक्रियेमध्ये विचार करण्यात आला. स्वराज्यातील निर्णय व न्यायप्रक्रियेमध्ये लोकसहभाग घेतला जात असल्यामुळे प्रशासनव्यवस्था व न्यायव्यवस्था प्रत्येक टप्प्यावर यशस्वी झाली. जोपर्यंत स्वराज्यातील शेवटच्या व्यक्तिला हे स्वराज्य आपले आहे असे वाटत नाही, जो पर्यंत पत्येक धोरण ठरत असताना तळातील व्यक्तिचा विचार होत नाही, प्रत्येकाच्या मानवी प्रतिष्ठेची कदर केली जात नाही, तो पर्यंत प्रत्येकाला कायद्यापुढे समानतेची वागणुक मिळत नाही हा छत्रपतींचा विचार काळाच्या पुढे होता.

समता आणि समानता ही स्वराज्याची ठळक वैशिष्ट्ये होती. महाराजांनी सर्वांना एकच कायदा व सर्व गुन्हयांसाठी सारखीच शिक्षा हे समतेचे तत्व निर्माण केले. गुन्हया शिवाय शासन होणार नाही. मात्र गुन्हेगार, मग तो कोणीही असो, तो सुटणार नाही. आधुनिक भाषेत सांगायचे तर छत्रपतींचे स्वराज्य हे कायद्याचे राज्य होते. व्यक्तीपेक्षा कायदा श्रेष्ठ होता. स्वराज्याची न्यायनिती ही सत्यावर अधारीत निरपेक्ष व निःस्पृह वृत्तीने न्यायदान करणारी,मानवतावादी विचारावर आधारलेली,समाजाच्या हिताची होती. छत्रपतींच्या निपक्षपाती न्यायदानामुळे समाजातील लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास शंभर पटीने वाढला. स्वराज्यात न्यायदानाचे काम करणा-या अधिका-यांकडून कोणावर अन्याय होणार नाही याची पूर्ण दक्षता घेतलेली असे. त्यामुळे खटल्याचे निकाल ताबडतोब लागत असत. पुंड, पाळेगार, चोरांना कठोर शिक्षा करून त्यांचा बंदोबस्त केला. त्यांच्यापासुन जनतेला त्रास होणार नाही याची चोख व्यवस्था केली.

स्वराज्यात न्यायदानामध्ये कधीही विलंब झाल्याचे दिसून येत नाही. राजे शहाजी महाराज व माता जिजाऊंच्या शिस्तीचा व प्रशासन व्यवस्थेचा आदर्श छत्रपती समोर होता. स्वराज्यातील प्रत्येक तटयांबाबत महाराज स्वत: संपूर्ण प्रकरण ऐकून व दोन्ही पक्षाचे म्हणने विचारात घेऊन लेखी व तोंडी पुराव्यांचा विचार करून, कागदपत्राची तपासणी करून निवाडा करीत असत. हे त्यांच्या न्याय व्यवस्थेचे वैशिष्ट्य होते.

स्वराज्यात फिरती न्यायालये व प्रत्यक्ष न्यायदान व्यवस्थापनाचे प्रयोजन उत्तम स्थानी छत्रपतीच होते. निराजी रावजींच्या मृत्युनंतर पल्हादपंत निराजी हे न्यायाधिश होते.न्यायाधिशाने दिलेल्या निवड पत्रावर संमत चिन्ह असे.विवाह कायदा, वारसा कायदा, मालमत्ता कायदा, दत्तक कायदा आदि. कायद्यांचा स्वराज्याच्या विधिनियमात समावेश होता. बेशिस्त, गैरवर्तन, फित्तुरी, लाचखोरी, अप्रामाणिकपणा यासारख्या गुन्हयाबददल कोणाचाही मुलाहिजा न बाळगता गुन्हेगारांना कठोर शिक्षा ढोढावल्या.यातुन स्वाराज्यातील प्रधान व सरकारी अधिकारीही सुटले नाहीत.सर्वांवर महाराजांची करडी नजर असे. छत्रपतींनी जनतेच्या मुलभुत हक्काचे संरक्षण करताना गुन्हेगारांना वचक बसेल अशी शिक्षा करून स्वराज्यातील न्यायदानाची पध्दत जलद केली. सरकारमध्ये सर्व जाती-धर्मातील लोकांचा समावेश करून महाराजांनी ख-या अर्थाने सामाजिक समरसता निर्माण केली. हात-पाय तोडण्याच्या शिक्षेपासून ते अगदी कडेलोट करण्यापर्यंतची शिक्षा अपराध्यांना दिली गेली.त्यामुळे सर्वत्र शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी न्यायदानाच्या माध्यमातुन सामाजिकदृष्ट्या वेग-वेगळ्या जाती-जमातींना एकत्रित आणले. त्यांच्यामध्ये सामाजिक सलोखा व ऐक्य निर्माण करणा-या शासनव्यवस्थेचा अवलंब केला. न्यायदानाच्या कामकाजात सहभागी होणारे अधिकारी हे वेग-वेगळ्या जाती-जमातीचे असल्याने त्यांच्या मध्ये एकमेकांविषयी आदराची व आपुलकीची भावना निर्माण होऊन सदभावना वाढीस लागली.खेडयातील न्यायनिवाडयाची सभाही सर्व जाती-धर्मातील लोकांची असे. यातुन छत्रपतींनी चार्तुवर्ण व्यवस्थेला तडका देऊन ती नष्ट केली. स्वराज्यातील न्यायव्यवस्था गावपातळीपासुन सुरु होत असे. ग्रामपंचायतीव्दारे न्यायनिवाडे केले जात असत. सर्व निर्णयप्रक्रिया अगदी कायदेशीर पध्दतीने चालत असे. स्वराज्यामध्ये न्याय हा वेळेवर पारदर्शक पध्दतीने दिला जात असे. न्याय देण्याच्या आतिम टप्प्यांपर्यंत एकूण प्रकियेची संपूर्ण विश्वसार्हता जपली जात होती. सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे यावर कटाक्ष होता.महाराजांनी सर्व धर्मिय प्रजेला न्यायाने वागविले. परधर्मियांना दिलेल्या समानतेच्या व न्याय वगणुकीमुळे स्वराज्यातील मुस्लिम अधिकारी त्यांचे विश्वासू बनले. अनेक ठिकाणी मुसलमान काझी न्यायाधिशाची भूमिका पार पाडीत होते. काझी अब्दुल महमूद, काझी नयबजी व पायदळ प्रमुख सरनोबत नुरखान बेग यांनी अनेक न्यायनिवाड्यात सहभाग नोंदविल्याचे दाखले आहेत.

स्वा-या व मोहिमेमध्ये असताना जर एखाद्याने गैरवर्तन केले तर त्यांची लष्करी न्यायालयाकडून ताबडतोब चौकशी केली जात असे. जर आरोप सिध्द झाला तर त्याला कडक शिक्षा (पान ६ वर)

---

आज १५ ऑगस्ट भारताचा स्वतंत्रता दिवस! उर भरून येतं मेरा भारत महान म्हणतांना! आज नेहमीच्या साच्यात अडकून न राहता जरा सत्याची कास धरणारा विचार करूया. आपल्याला स्वतंत्रता दिवस साजरा करायचा आहे पण आपण पारतंत्र्यात कसे गेलो याचा आपण कधी विचार केला का?

स्वतंत्रता म्हणजे केवळ बाह्य शत्रूपासून मुक्ती नव्हे. स्वतंत्रता म्हणजे आपल्या अंतर्मनात विराजमान शत्रूपासून मुक्ती. स्वतंत्रता म्हणजे अज्ञान, अंधश्रद्धा, अंधविश्वास आणि लोकधर्मापासून मुक्तता.इतिहासातील आठवणी उगाळत बसण्यापेक्षा त्यातून काही बोध घेणं आणि सतर्क रहाणं म्हणजे स्वतंत्रता. मानवी जीवनाप्रमाणे पशु प्राण्यांना मुक्त जीवन जगता यावं म्हणजे स्वतंत्रता!




# स्वतंत्र भारताची ७९ वर्ष

## उत्सव आनंदाचा पण आत्मपरीक्षणाचा!


गुलामीबद्दल विचार केला तर गुलामीचे बीज फक्त इंग्रजांनी रोवले नाही तर त्यांना मदतरूप ठरणारे भारतातले राजेही त्याला जवाबदार होते. इंग्रज आलेच पण डच, पोर्तुगीज, हुण, अरब, मुघल, तुर्क, शक, जपान, चीन यांनीही आक्रमण केले. मूठभर लोक येतात आणि हुकूमत गाजवतात याचा अर्थ ते शक्तिशाली होते असे नाही ; तर आपण एकजूट नव्हतो. आपण कधी हा विचारच करत नाही की गुलामी आली कशी? ज्या राष्ट्राचा नागरिक प्रश्न विचारणं सोडतो तिथे स्वतंत्रता कमकुवत असते.

निस्तेज मनुष्यांबरोबर तेजस्वी राष्ट्र होणे अशक्य. ज्यांना धर्माचा ठावठिकाणा माहीत नसतो धार्मिक कर्मकांड करण्याची सूट आणि ज्यांना राष्ट्र आणि लोक कल्याणाची जाण नसते त्यांना राष्ट्राचे प्रतीक तिरंगा लावण्याची सूट मिळाली की परिणामस्वरूप ते ना स्वतंत्र राष्ट्र उरतं ना धर्म!

सर्वोत्तम संस्कार असलेला देश सहजगत्या गुलामीत गेला. कोणालाही आर्थिक रूपात गुलाम करण्याचा सुविधाजनक मार्ग म्हणजे त्याला मानसिक रूपाने गुलाम करायचा आणि त्यांच्या संस्कृतीवर हल्ला बोलायचा. छत्रपती शिवाजीराजे, शम्भूराजे, राणाप्रताप, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, शहीद भगतसिंह, वीर सावरकर, महात्मा गांधी, सरदार पटेल, लोकमान्य टिळक, कितीतरी महान धुरंधरांनी देशाला मुक्त करण्यात प्राण गमावले. आपण त्यांचे चिर - ऋणी आहोत. परंतु काही तथ्य आणि सत्य जाणून घेणं महत्वाचं आहे.

१५ ऑगस्ट १९४७ भारताला स्वातंत्र्य मिळालं. भारत स्वतंत्रता दिवस साजरा करत असतांना बापू तिथे उपस्थितच नव्हते. स्वाधीनता आंदोलनाचे सर्वोच्च नेते महात्मा गांधी तेव्हा दिल्लीपासून दूर कलकत्ता येथे बेलियाघाट परिसरातल्या हैदरी हाऊसमध्ये होते. हे तेच स्थान आहे जिथे बसून त्यांनी संप्रदायिक दंगल थांबवण्यासाठी आमरण उपोषण केले. त्यानंतर हिंदू - मुस्लिम समुदायाच्या दिग्गज नेत्यांनी गांधीजींची माफी मागितली.

आजवर आपल्याला कधीही हा प्रश्न पडला नाही की भारताला स्वातंत्र्य १५ ऑगस्टलाच का मिळालं? हीच तारीख निश्चित का केली? ज्यावेळी लॉर्ड माऊंटबॅटनला विचारण्यात आले की सत्ता हस्तांतरणाची तारीख कुठली ठरली? त्यावेळी माउंटबॅटन म्हणाले, ''भारतीयांना हातात सत्ता १५ ऑगस्ट १९४७ ला दिली जाईल.'' इतिहासकार राज खन्ना यांनी आजादी से पहले और आजादी के बाद या पुस्तकात लिहिले आहे की मौलाना आझाद यांनी लॉर्ड माऊंटबॅटन यांना फाळणीच्या दुष्परिणामांची हकीकत सांगून देशाच्या स्वातंत्र्याची तारीख एक वर्ष पुढे ढकलावी म्हणून विनंती



केली परंतु लॉर्ड माऊंटबॅटन यांनी कोणालाही न जुमानता १५ ऑगस्ट तारीख ठरवली. राज खन्ना पुढे लिहितात की माउंटबॅटनचे प्रेस सचिव कॅम्प वेल जॉन्सन यांनी एकदा खुलासा केला होता की १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस निवडला गेला कारण १५ ऑगस्ट १९४५ ला जपानच्या सेनेने मित्र देशांच्या सेने पुढे आत्मसमर्पण केले होते. म्हणून लॉर्ड माऊंटबेटनची इच्छा होती की भारताला त्याच दिवशी स्वतंत्र

ऋचा सुनील पारेख
मो. ९९३०१ २१४९०

करायचं जो दिवस ब्रिटन इतिहासातला खास दिवस असेल.

आपल्याला हेदेखील जाणणे गरजेचे आहे की लाल किल्ल्यावर स्वतंत्रता दिवस समारोह १५ ऑगस्ट १९४७ ला साजरा केला नाही तर तो समारोह १६ ऑगस्ट १९४७ ला संपन्न झाला. झेंडा रोहन झाल्यावर पंडित नेहरूंनी देशाला संबोधित केले. ( संदर्भ - विवेक शुक्ला) अर्थात जिथे देश नक्की स्वतंत्र कधी झाला हेच आपल्याला पूर्ण ज्ञात नाही तिथे आपण स्वतंत्रता दिवस साजरा करतो म्हणजे नेमकं काय करतो? आज पर्यंत भारतात आणि ग्रेट ब्रिटनमध्ये कुठल्याही दस्तावेजावर भारत १५ ऑगस्ट ला स्वतंत्र झाला असा उल्लेख नाही.

१९३७ मध्ये वंदे मातरम गाण्यावरून वाद झाला. मुस्लिमांनी आक्षेप घेतला की यात अनेक देवी देवतांची नावे येतात त्यांना आम्ही वंदन करू शकत नाही कारण अल्लाहपेक्षा श्रेष्ठ आम्ही कोणाला समजत नाही. आमच्या भावनांना ठेच लागते. मौलाना आजाद यांनी अजेंडा आखला आणि वंदे मातरम फक्त एकच कडवं घ्यावं असं घोषित केलं.हे वाचल्यावर मनाला प्रश्न विचारा की आपण खरंच स्वतंत्र झालो आहोत का? कारण आपण आजही एकच कडवं गातो मग ती शाळा असो की समारोह!

स्वातंत्र्यानंतर आपण संपन्न निश्चित झालो पण समृद्ध नाही. आयुष्याच्या समृद्धीचे प्रतीक आहे औदार्य, सहिष्णुता, सौहार्द्र, बंधुत्व, वसुधैव कुटुम्बकम, आणि ऐक्य! मनुष्य असहिष्णू आणि विभाजित असला की निर्धन असतो. काहीसं आज तेच चित्र आहे . पैशाचे धनी अनेक असतील पण समृद्ध नाही.

अनेक वर्षांपूर्वी आपले पूर्वज भलेही धनाच्या दृष्टीने निर्धन होते परंतु मनुष्याच्या दृष्टीने समृद्ध, पौरुषेय आणि जिजीविषाने भरपूर होते. स्वातंत्र्यानंतर भारताने प्रचंड प्रगती केली हे निश्चितच कौतुकास्पद आहे. भारत एक केवळ राष्ट्र नाही तर विविधतेत एकता, संस्कृतीचा वारसा आणि अध्यात्माची



भूमी आहे. डिजिटल भारत, कृषी क्षेत्रात प्रगती, उद्योगक्षेत्रात प्रगती, पायाभूत सुविधांचा विकास, संरक्षण क्षेत्र, अंतराळ क्षेत्रातली भरारी ज्यामुळे आपण अभिमानाने मेरा भारत महान घोषणा देतो. ही केवळ अभिमानाची घोषणा न राहता देशाला अधिक सक्षम आणि समृद्ध बनवण्याची आणि आपली मूल्य टिकवून ठेवण्याची जवाबदारी आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ उत्सव नाही तर विरांच्या बलिदानाची गाथा आहे.

जे जे सत्य ते ते स्वीकारूया. देशहिताची शपथ घेऊन सुंदर भारत घडवूया.. आणि हो.. वंदे मातरम पूर्ण म्हणूया!

---

# स्वातंत्र्याची ७९ वर्षे : पायाभूत सुविधांच्या बळावर विकसित भारताकडे!

भारताच्या स्वातंत्र्याला ८० वर्षे पूर्ण होत आहेत. हा केवळ उत्सवाचा क्षण नाही, तर आत्मपरीक्षणाचा आणि भविष्याचा विचार करण्याचा क्षण आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने अनेक संकटांचा सामना केला. विभाजन, अन्नटंचाई, मर्यादित औद्योगिक क्षमता, अपुरी वाहतूक व्यवस्था, वीजेचा अभाव, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील मर्यादा - अशा अनेक अडचणींमधून देशाने वाट काढली. आजचा भारत त्या भारतापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारताकडे पाहिले जाते. या परिवर्तनामागे अनेक घटक असले तरी त्याचा सर्वात भक्कम पाया म्हणजे पायाभूत सुविधांचा विकास.

एखाद्या राष्ट्राची प्रगती केवळ जीडीपी च्या आकड्यांवर

पार्थ विकास कपोले
धुळे, मो.८८३००९३०५१


मोजली जात नाही. त्या राष्ट्रातील महामार्ग, रेल्वे, बंदरे, विमानतळ, वीजपुरवठा, पाणी व्यवस्था, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि शहरी वाहतूक व्यवस्था यावर त्याची आर्थिक ताकद उभी असते. म्हणूनच पायाभूत सुविधा हा विकासाचा खर्च नसून भविष्यातील समृद्धीचा पाया असतो.

राष्ट्रनिर्मितीचा अदृश्य पाया

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही दशकांत भारताने धरणे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, रेल्वे विस्तार, राष्ट्रीय महामार्ग आणि ऊर्जा प्रकल्प यांवर भर दिला. त्या काळात उभारलेली मोठी धरणे आणि औद्योगिक प्रकल्प हे आधुनिक भारताच्या पायाभूत विकासाचे प्रतीक मानले गेले. त्यानंतर उदारीकरणाच्या काळात बंदरे, दूरसंचार, खासगी गुंतवणूक आणि शहरी विकासाला नवी दिशा मिळाली.

परंतु गेल्या दशकात पायाभूत सुविधा क्षेत्रात विकासाचा वेग आणि व्याप्ती दोन्ही लक्षणीयरीत्या वाढले. महामार्ग, एक्स्प्रेसवे, मेट्रो रेल्वे, विमानतळ, मालवाहतूक कॉरिडॉर, नवीकरणीय ऊर्जा, जलमार्ग, ग्रामीण पाणीपुरवठा आणि डिजिटल पायाभूत सुविधा या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. या विस्तारामुळे भारताची अर्थव्यवस्था अधिक जोडली गेली, वाहतूक खर्च कमी झाला, उद्योगांना गती मिळाली आणि नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाली.

पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकास




रस्ते आणि रेल्वे हे केवळ प्रवासासाठी नसतात; ते व्यापाराचे रक्तवाहिनीसारखे काम करतात. शेतकऱ्याचे उत्पादन बाजारात पोहोचवण्यासाठी रस्ते आवश्यक असतात. उद्योगांना कच्चा माल आणि तयार माल वाहून नेण्यासाठी रेल्वे आणि बंदरे लागतात. निर्यात वाढवण्यासाठी सक्षम लॉजिस्टिक नेटवर्क आवश्यक असते. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी वीज, पाणी आणि शहरी सुविधा महत्त्वाच्या असतात.

याच कारणामुळे विकसित राष्ट्रे पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक करतात. चीनने महामार्ग आणि बंदरांमध्ये केलेली गुंतवणूक, अमेरिकेचे रेल्वे आणि इंटरस्टेट नेटवर्क, युरोपची बहु-माध्यम वाहतूक व्यवस्था - या सर्व उदाहरणांमधून एक गोष्ट स्पष्ट होते : पायाभूत सुविधा मजबूत असतील, तर अर्थव्यवस्था वेगाने वाढते.

भारतानेही या दिशेने महत्त्वाची पावले उचलली आहेत. कार्यान्वित डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरचे सुमारे २,८४३ किमी नेटवर्क, एक्स्प्रेसवे नेटवर्कमध्ये मोठी वाढ, चार-लेन आणि त्यावरील राष्ट्रीय महामार्गांचा विस्तार, मेट्रो रेल्वेचा अनेक शहरांपर्यंत विस्तार, रेल्वे विद्युतीकरणातील मोठी झेप, नवीकरणीय ऊर्जेची क्षमता वाढणे, कार्यरत विमानतळांची संख्या वाढणे आणि नळाद्वारे पाणीपुरवठ्याचा विस्तार ही त्याची काही ठळक उदाहरणे आहेत. या बदलांमुळे भारताची उत्पादनक्षमता आणि स्पर्धात्मकता वाढण्यास मदत झाली आहे.

ग्रामीण भारताचा बदलता चेहरा

पायाभूत सुविधांचा विकास हा केवळ महानगरांसाठी नसतो. ग्रामीण भारतात रस्ते, वीज, पाणी आणि डिजिटल सेवा पोहोचल्यामुळे शिक्षण, आरोग्य, ई-कॉमर्स, ग्रामीण उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतात. आज अनेक गावांमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षण, टेलिमेडिसिन, डिजिटल पेमेंट्स आणि सरकारी सेवा उपलब्ध होत आहेत.

ग्रामीण भागात नळाद्वारे पाणीपुरवठा, ग्रामीण रस्ते, वीजेचे जाळे आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी यांचा विस्तार झाल्यामुळे सामाजिक आणि आर्थिक समावेशनाला चालना मिळाली आहे. त्यामुळे पायाभूत सुविधा ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचीही साधने ठरली आहेत.

भारताच्या पुढील २० वर्षांची दिशा

२०४७ मध्ये भारत स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात प्रवेश करेल. पुढील वीस वर्षे भारतासाठी सर्वात निर्णायक ठरणार आहेत. आज निर्माण होत असलेली पायाभूत सुविधा ही २०४७ च्या भारताची पूर्वतयारी आहे. त्या काळातील भारताची कल्पना करताना काही गोष्टी स्पष्टपणे दिसतात. उच्च-गती रेल्वे, बहु-माध्यम वाहतूक व्यवस्था, हरित ऊर्जा आधारित उद्योग, स्मार्ट शहरे, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सार्वजनिक सेवा, जलव्यवस्थापन, (पान ६ वर)



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

# अंतजागृत बुद्धी



विचार कल्पतरू मनुष्याला आपल्या अंतर्जागृत बुद्धीवर ताबा मिळविणे फारच कठीण असते, कारण तिथे विचारांनी एकदा ठाणे मांडले की त्यांना तेथून काढणे फार मुश्किलीचे असते. पण आंतर्जागृत बुद्धीत कोणते विचार जाऊ द्यावयाचे आणि कोणते जाऊ द्यायचे नाही ही गोष्ट मात्र जागृत बुद्धीच्या स्वाधीन असते. जागृत बुद्धी ही जणू काही पहारेकऱ्याचे काम करते असे म्हटले तरी वावगे होणार नाही .तिच्या संमतीशिवाय कोणताही विचार अंतर्जागृत बुद्धित शिरू शकत नाही. विचारांचा असा गुण आहे की साधे म्हणजे तीव्र भावनायुक्त नसलेले विचार अंतर्जागृत बुद्धी त जाऊन बसू शकत नाही .भावनांनी उद्दीपित झालेली विचार आंतर्जागृत बुध्दीत सहज शिरतात आणि जितकी भावना तीव्र असेल त्या मनाने ते खोल जाऊन बसतात. दररोज आपण जागृती अवस्थेत शेकडो विचार करतो पण त्यापैकी क्वचितच एखाद्या आंतर्जागृत बुद्धी त शिरतो.पण दुःख, अपमान, अपयश ,भीती, द्वेष ,मत्सर, सूड ,काळजी इत्यादी भावना जेव्हा तीव्र स्वरूपाच्या असतात तेव्हा त्यांच्या संबंधीचे विचार मात्र बऱ्याच प्रमाणात आंतर्जागृत बुद्धीत शिरतात आणि तेथे दबा धरून बसतात .केवळ अनिष्ट भावनायुक्त विचारच अंतर्गत जागृत बुद्धी शिरतात असे मात्र नाही .त्या दृष्टीने अंतर्जागृत बुद्धी ही सर्वांना समान समजणारी आणि निपक्षपाती असते तिला ईष्ट अर्निष्ट भावनायुक्त विचारांचा विधी निषेध नसतो. विचार फक्त तीव्र भावनायुक्त असला म्हणजे झाले. अनिष्ट आणि दुष्ट विचार जागृत बुद्धीत आपोआप येतातआणि तेथून आंतर्जागृत बुद्धी त सहज जातात .पण सद्भावना विचार मात्र जागृत बुद्धीत मुद्दाम आणावे लागतात .तेव्हाच ते अंतर्जागृत बुद्धीत जाऊ शकतात .जागृत बुद्धीवर सतत ताबा न ठेवल्यास दुःख, निराशा, काळजी, भीती राग व्देष मत्सर सूड इत्यादी अनिष्ट भावना युक्त विचार जागृत बुद्धीत येऊन अंतर्जागृत बुद्धीत आपोआप जातात. पण उत्साह, आशा, प्रेम ,दया, क्षमा ,भक्ती भाव, सुख, धैर्य इत्यादी सद्भावना युक्त विचार जागृत बुद्धीमध्ये मुद्दाम आणावे लागतात .तेव्हा ते तिथून अंतर्जागृत बुद्धी त शिरू शकतात.

ज्याप्रमाणे परस्पर विरुद्ध भावना मनात एकाच वेळी राहू शकत नाही त्याप्रमाणे अंतर्जागृत बुद्धीतही ईष्ट आणि अनिष्ट भावनायुक्त विचार एकाच वेळी राहू शकत नाही, म्हणून अंतर्जागृत बुद्धीत अनिष्ट भावना युक्त विचारांचा शिरकाव झाला असेल तर ते काढण्याकरिता इष्ट भावना युक्त विचार जागृती अवस्थेत सदैव बुद्धीत बाळगणे हा एकच उपाय असतो . इष्ट भावना युक्त विचार जागृत बुद्धीच्या द्वारे अंतर्जागृत बुद्धीत शिरले म्हणजे अनिष्ट भावना युक्त विचार तेथून हळूहळू निघून जातात आणि कालांतराने अंतर्जागृत बुद्धी त पूर्णपणे इष्ट भावनायुक्त विचारच राहतात. अंतर्जागृत बुद्धीवर प्रत्यक्षपणे आपला अधिकार चालत नसला तरी याप्रमाणे अप्रत्यक्षपणे चालू शकतो. विचार कल्पतरू_आपण सुखी किंवा दुःखी, यशस्वी वा अयशस्वी होणे आपल्या स्वतःच्या मनावर आहे. जसे होण्याची आपली इच्छा असेल तशा प्रकारचे दृढ श्रद्धायुक्त विचार आपण जागृता अवस्थेत बुद्धीत ठेवीत गेल्यास कालांतराने आपल्या विचारांना मूर्त स्वरूप येते असा अनुभव येतो .आपणास सुखी आणि यशस्वी होण्याची इच्छा असल्यास सुखाचे व यशाचे विचार जागृत अवस्थेत बुद्धीत ठेवीत गेले पाहिजे .अपयशाचे आणि दुःखाचे विचार करीत राहणारी मनुष्ये अपयशी आणि दुःखी झाल्या शिवाय राहत नाही. मनुष्य जे विचार जागृत अवस्थेत बुद्धीत ठेवून तदनुसार प्रयत्न करीत राहतो त्या विचारांना मृत स्वरूप प्राप्त होण्याची प्रबळ प्रवृत्ती नेहमी दिसून येते जसे मनुष्याचे विचार असतात त्यानुसार तिच्या भावना बनतात आणि भावनांनुसार कृती बनते मनुष्य निर्भयपणे एखाद्या उंच शिडीवर चढू लागला तर तो वाटेल तितका उंच चढू शकतो पण आपण पडू कि काय असा विचार त्याच्या बुद्धीत आल्याबरोबर त्याचे पाय लटपटू लागतात व त्याचा झोक जाऊन तो पडण्याचा ही संभव असतो. म्हणून मनुष्याने सर्व परिस्थितीमध्ये आपल्या जागृत बुद्धी तउच्च प्रकारचे आणि इष्ट भावनायुक्त विचार च ठेवीत गेले पाहिजे कोणत्याही प्रकारच्या कु विचारांना कधीही थारा देता कामा नये म्हणजे त्याच्या भावना उत्तरोत्तर शुद्ध होऊन त्याच्या हातून उच्च कर्मे घडत जातात त्याची पारमार्थिक आणि व्यवहारिक दृष्टीने उन्नती होत जाते व तो साहजिकच सद्गुणी सदाचारी सुखी आणि यशस्वी होतो. बुद्धितील कु विचार काढून त्यांच्या जागी सुविचार स्थापन करण्याकरिता आत्म सुचनांची फार मदत होते. मनुष्य जागा असतो तोपर्यंतच जागृत बुद्धीचे व्यापार चालू असतात. पण आंतर्जागृत बुद्धी च्या व्यापारात केव्हाच खंड पडत नाही. कोणत्याही विषयासंबंधाने तीव्रपणे विचार करण्यात जागृत बुद्धी गढलेली असली म्हणजे झोपेतही तेच विचार अंतर्जागृत बुद्धीत चालू राहतात. याचा अर्थ जागेपण केलेले विचारच झोपेत अंतर्जागृत बुद्धीत चालू राहतात म्हणून जागे पणी चांगले विचार करावे म्हणजे झोपेतही चांगले विचार चालू राहतील.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

# प्रेरणा

काटदरे सरांनी मृणालीला स्टाफरूममध्ये बोलावून घेतले. मृणालीला वाटले की एखाद्या वक्तृत्व स्पर्धेची माहिती देण्यासाठी सरांनी बोलावले असेल. ती स्टाफरूममध्ये गेली तेव्हा प्राचार्यही तिथेच बसले होते. ते कसली तरी गंभीर चर्चा करत होते.

मृणालीला पाहून काटदरे सर म्हणाले, मृणाली परवाच्या गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन तुला करायचं आहे. कार्यक्रमाचे स्वरूप मी तुला थोड्या वेळाने सांगतो. दुसरी सूचना अशी की परवाच्या कार्यक्रमासाठी तुझ्या मम्मीला आमंत्रण आहे. त्यांना सोबत घेऊन ये. 'सक्रिय माता-पालक' म्हणून त्यांचा सत्कार करायचा आहे आणि त्यांना मनोगत मांडण्याची संधी दिली जाणार आहे. तू हे सगळं तुझ्या मम्मीला सांग. संध्याकाळी मी व जाधव सर तुझ्या घरी आमंत्रण देण्यासाठी येऊ.

सर! संध्याकाळी थोडे उशिरा या. माझी मम्मी उशिराने घरी येते. म्हणजे तुमची भेट होईल. मृणाली विनम्रतेने म्हणाली.

ठीक आहे, आता तू जा. सूत्रसंचालनाच्या तयारीला लाग. मी येतोच तुझ्याशी बोलायला. असं म्हणून काटदरे सर प्राचार्यांशी बोलायला निघून गेले.

आपल्या मम्मीचा सत्कार होणार आहे, याचा मृणालीला केवढा आनंद झाला होता! मात्र सूत्रसंचालनाची जबाबदारी नीट पार पाडण्याचा काहीसा ताणही तिच्या मनावर आला होता. तसं तिने दोन-तीनदा शाळेतल्या वेगवेगळ्या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केलेलेही होते. आताच्या वेळेस मम्मीसमोर ही जबाबदारी पार पाडायची आहे, याची तिला जाणीव झाली.

खरंतर दोन वर्षांपूर्वी मृणालीचा आपल्या मम्मीविषयी काहीसा गैरसमज झाला होता. तिची मम्मी तिला सारखा अभ्यास करण्यास सांगायची. छंदाच्या काही गोष्टी करायला घेतल्या की तिचे एकच म्हणणे असे की, या गोष्टी केल्याने तुझे पोट भरणार नाही.''

मृणालीला तेव्हा खूप राग आला होता. ती आपला आनंद हिरावून घेतेय, असं तिला वाटत होतं. मात्र तिने केलेल्या आग्रहामुळे मृणालीला वार्षिक परीक्षेत उल्लेखनीय गुण मिळाले. त्यामुळे दहावीच्या विशेष तुकडीत तिला प्रवेश मिळाला. तेव्हा मृणालीच्या मनातला गैरसमज कमी झाला होता. तरी मम्मीविषयी विचार करताना तिने आपल्याला अधिक वेळ द्यावा, असं तिला मनोमन वाटत होतं. मात्र ती दिवसातला बराच वेळ घराबाहेर असते. घरात असली तरी परिसरातील अनेक महिलांशी तिच्या भेटी, चर्चा सुरू असतात. त्यामुळे मृणाली थोडी नाराज व्हायची.

मात्र मागच्या वर्षी एक घटना घडली. प्राथमिक शाळेत माध्यान्ह आहार शिजवून देणाऱ्या काकू हृदयरोगाने अचानक निवर्तल्या. शाळेतील चारशे विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजवून द्यायला अचानक कोणी तयार होईना. शाळाप्रमुखांपुढे मोठा पेच निर्माण झाला होता. कोणीतरी त्यांना सुलभाताई म्हणजे मृणालीच्या मम्मीचं नाव सांगितले. सुलभाताई महिला बचत गटांच्या समन्वयक म्हणून काम करतात. त्यांनी एका गटातील महिलांशी चर्चा केली. दोन पैसे कमी मिळतील मात्र चारशे मुलांना जेवू घातल्याचे पुण्य मिळेल, या भावनिक हाकेला काही महिलांनी प्रतिसाद दिला नि शाळेतील पोषण आहाराचा प्रश्न त्या वर्षापुरता मिटला. तेव्हापासून परिसरात सुलभाताईंचे नाव झाले. महिलांच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर त्या काम करत होत्या. घरकाम मिळवून देण्यापासून ते बँकेत खाती काढणे, तसेच बँकेतून भांडवलासाठी कर्ज मिळवणे, महिलांच्या सभा घेणे, त्यांची जाणीव जागृती करणे यासारख्या कामात त्यांनी झोकून दिले होते. स्वतः एका बचत गटाच्या माध्यमातून त्यांनी पापड निर्मितीचा उद्योग सुरू केला होता. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्यांना चार पैसे मिळत.

जेव्हा परिसरातील महिला सुलभाताईंकडे आपले गाऱ्हाणे किंवा समस्या घेऊन येत आणि जाताना त्यांच्याविषयी अत्यंत प्रेमाने, विश्वासाने व आदराने बोलत, तेव्हा मृणालीला आपल्या मम्मीचा खऱ्या अर्थाने अभिमान वाटू लागला.




आता तर परवा शाळेत तिचा सत्कार होणार आहे, ही गोष्ट घरात सांगितली तर सर्वांनाच आनंद होईल. तिचे बाबा मात्र कार्यक्रमाला येऊ शकणार नाहीत. माथाडी कामगार म्हणून ते मुंबईच्या भाजी मार्केटमध्ये काम करतात. दोन तासांच्या कार्यक्रमासाठी त्यांना इतका प्रवास करून येणे शक्य नाही, याची मृणालीला जाणीव होती. आजी-आजोबांना नक्की आनंद होईल, याची तिला खात्री होती. तिने मनातल्या भावनांना आवर घातला नि निवेदनाच्या तयारीसाठी ती ग्रंथालयात गेली. गुरूपौर्णिमेच्या दिवशी शाळेच्या सभागृहात खूप लोक जमले होते. संस्थेचे अध्यक्ष कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार होते, त्यामुळे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी सजग होते.

सुरूवातीला गुरुवंदना झाली. शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी मनोगते झाली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या यशातील वाटेकरी असणाऱ्या सक्रिय पालकांच्या सत्काराच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. नववी आणि अकरावीच्या वर्गातील आदर्श वर्तन करणाऱ्या व परीक्षेत उत्तम गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची पार्श्वभूमी समजून घेऊन 'सक्रिय पालक' म्हणून दोन पालक निवडण्यात आले होते. त्यात सुलभाताईंची निवड झाली होती. सत्कार स्वीकारल्यानंतर सुलभाताई आत्मविश्वासाने मंचावर आल्या नि आपले मनोगत मांडू लागल्या.''सक्रिय पालक म्हणून ज्याच्यामुळे मला पुरस्कार मिळाला त्या माझ्या लाडक्या मुलीचे, मृणालीचे प्रथम खूप कौतुक करीन. तिचा सर्वात उत्तम गुण म्हणजे ती वडीलधाऱ्यांच्या सूचनांचे पालन करते. सुरुवातीला माझ्या बोलण्याचा तिला राग यायचा. मी तिला सतत सांगते की 'बाई गं, तुझ्या छंदाच्या, आवडीच्या गोष्टींमध्ये सदासर्वकाळ रमू नकोस. तू कमावती हो! चार पैसे हातात असले की मनाप्रमाणे जगता येते. माझी तरी अक्कल एवढीच आहे. मी तिला घरातल्या कामासाठी फारसा आग्रह धरला नाही. त्याऐवजी तिने वाचन करावे, गृहपाठ करावा, भाषण पाठांतर करावे, यासाठी आग्रही धरते. माझ्या मुलीचे भविष्य उज्ज्वल असावे असे मला वाटते. ते सर्व पालकांना आपल्या पाल्याविषयी वाटत असावे. मला ही प्रेरणा माझ्या माहेरच्या शारदाकाकींकडून मिळाली. घरच्या अत्यंत गरीब परिस्थितीमुळे माझे आईवडील गांजले होते. आम्ही पाच बहिणी आणि दोघे भाऊ. मुलींची लग्नं कशी होतील, या चिंतेत आई-बाबांना मी नेहमी बघायचे. शाळेत मी हुशार होते. आमच्या शेजारच्या शारदाकाकींचा माझ्यावर फार जीव होता. त्या मला नेहमी सांगायच्या, सुलभा, तुला तुझ्या परिस्थितीतून बाहेर पडायचं असेल तर कमावती हो!'' काकींच्या बोलण्यातील 'कमावती' हा शब्द मी कायम ध्यानात ठेवला.

दुर्दैवाने शिक्षण अर्धवट सुटले, लग्नाच्या बंधनात अडकले. काकींचे शब्द मात्र काळजावर कोरले होते. कमावती होण्यासाठी कधी घरकाम, कधी शिवणकाम केले. त्यातून ओळखी वाढत गेल्या. मग बचत गट स्थापन केला. त्यातून पापड उद्योग सुरू केला. इतरांना मदत करू लागले. मनात एकच ध्येय होतं, 'कमावती' व्हायचं. महिलांच्या हातात त्यांनी स्वतः कमावलेले चार पैसे असतील, तर त्या आनंदाने जगू शकतात, हा अनुभव असल्यामुळे मी मृणालीला आग्रहाने सांगत असते, 'बाई गं, ज्या परिस्थितीत तू जन्माला आलीस, त्याच खाईत जगू नकोस. तुझं नवं जग तू तयार कर. त्यासाठी खूप शिक आणि कमावती हो!' माझ्या मते शिक्षणाने कमाईला हातभार लावला पाहिजे. नुसतंच शिकून काय फायदा आहे सांगा बरं? शिक्षणामुळे कमावते व्हायला हवे. कमाई असेल तरच जीवन नीट जगता येते. मी माझ्या मृणालीला कमावती करणार आहे. तिला स्वावलंबी बनवणार आहे. म्हणून मी तिच्या शिक्षणाविषयी कायम सतर्क असते.

मला बोलायची संधी दिली म्हणून सर्वांचे आभार मानते.'' मंचावरून सुलभाताई खाली उतरत होत्या. सभागृह टाळ्यांच्या आवाजाने भरून गेले होते. डोळ्यातून आलेले अश्रू पुसत मृणाली पुढे आली नि तिने सुलभाताईंना गच्च मिठी मारली. श्रोते शिक्षणाविषयी नव्याने विचार करत पुढच्या कार्यक्रमाच्या घोषणेची वाट पाहू लागले.

## भाऊबंदांच्या जिव्हाळ्याचा आणि भक्ती पर्वाचा

# कानबाई उत्सव

कानबाईचा हा सण बालकापासुन तर वृद्धांपर्यंत अत्यंत ऊत्साहात साजरा होणारा सण आहे. हा सण ग्रामीण भागात जास्त प्रभावशाली होत असतो. खान्देशात हा सण प्रचलित आहे. कानबाईचा देश म्हणजे कान्हदेश असं ही म्हणतात. आणि कान्ह चा अपभ्रंश होऊन खान्देश झाला असे सांगण्यात येते.. हा सण श्रावण महिन्यात येतो.शेतात जोमदार पिके असतात.सर्वत्र हिरवळ दिसते.निसर्गाने अलंकार परिधान केलेला असतो. पशुपक्षी यांची आनंदात किलबिलाट ऐकाला मिळत असते. नद्या-नाले खळखळून वाहतात. असे वाटते कानबाई मातेच्या आगमणाची तयारी झालेली आहे. काही ठिकाणी हातापायाची कानबाई असते.तर काही ठिकाणी कळसावर ठेवलेले नारळ म्हणजे प्रतिकात्मक कानबाई असते. त्या नारळाला आकर्षकपणे सजवले जाते. छानशी मोत्यांची माळ व फुलहार घालतात. रंगीत शालू नेसवतात. चौरंगावर बसवतात. चौरंगाला चारही बाजूला केळीच्या खांबाचे लहान लहान पील बांधतात. ज्या घरी कानबाई बसवण्याची हौस असते ते आपल्या घरी कानबाई पाहूणी म्हणून आणतात.व मोठ्या हौशेने कानबाईचा ऊत्सव साजरा करतात. हा सण एकत्र येऊन साजरा करतात. भाऊ काका हे जरी विभक्त झालेले असतील तरी एकत्र येतात.एकत्र रोट करतात.पहिला दिवस हा भाजीभाकरीचा रोट असतो. दुसर्या दिवशी कानबाई बसते. तिसरे दिवशी कानबाई ऊठवतात.


दुष्काळ ,रोगराई याचा बचाव करण्यासाठी कानबाई मातेला आराधना करतात. लोकांकडून काही चूक झाली असेल त्यामुळे घरात, गावात संकटे येतात. संकटे दुर व्हावेत म्हणून मातेची मनोभावे पूजा करतात. सुवासिनींची कूस ऊजळण्यास कानबाईमातेची कृपा असते. ही भावना ग्रामीण लोकांमध्ये फार पूर्वीपासून तर आज ही आहे.. यासाठी नवदामपत्यास पुजेला आग्रह धरतात. नवस मानतात, नवस फेडण्यासाठी कानबाई मातेला डोक्यावर घेऊन नाचतात. रानात धनधान्य भरपुर पिकवते ती रानबाई असते.खान्देशात लोक संस्कृतीच्या कानबाई व रानबाई या लोक संस्कृतीच्या देवता आहेत.

म्हणुन श्रावण या पवित्र महिन्यात शुक्ल पक्षात नाग पंचमी नंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी कानबाई देवीची स्थापना करतात. आपल घर शेणाने सारवलं जातं गाईच्या गोमूत्राने सर्वत्र शिपून त्याला पवित्र केलं जाते. कानबाई आईचा उत्सव स्वच्छता, सुंदरता व मांगल्य व एकात्मतेचं प्रतिक आहे. आता तर सिमेंटची घरे झाली त्याची फरशी पुसुन स्वच्छ करतात.कामे सोपी झालेली आहेत.

विशेष गोष्ट म्हणजे आंबा गोड लागतो. या आंब्याच्या झाडाच्या लाकडापासून बनवलेला चौरंगावर मातेला बसवले जाते. चौरंगावर लाल वस्त्र ठेवतात. त्याला आपण लालमद्रा असंही म्हणतो. त्यावर गहू ठेवतात गव्हावर तांब्याचा कळस ठेवतात. कळसात पवित्र नदीचे पाणी भरतात. त्यात पाच विड्यांची पाने ठेवतात. मग त्यावर नारळ ठेवतात. भाऊबंदच्या एक किंवा दोन घरात कानबाई बसत असते. तिथे सर्व भाऊबंद पुजेला जातात. मातेला हिरवा शालू 'नाकात नथ, कपाळी लाल कुंकु शोभून दिसत असतो. ज्यांना नवीनच कानबाई आईची स्थापना करावयाची असेल तर ते एक नारळ एखाद्या जुन्या कानबाई जवळ देव्हाऱ्यात किंवा जेथे पारंपारिक कानबाई असेल तेथे रात्रभर ठेवतात. दुसऱ्या दिवशी नवीन लग्न झालेलं जोडपं डुबली या बाद्याच्या तालावर घरी आणून स्थापना करतात. कानबाईला फक्त पारंपारिक वाद्य चालतात. इतर कुठलेही बाद्य चालत नाही ही आईच्या आवडीची वाद्ये आहेत.

पुजेचं साहित्य हळद, कुंकु, उदबत्या, पूजेच्या सुपाऱ्या, जुने दिवे, समई व त्यात गाईचे तूप घालून ज्योत सतत तेवत ठेवतात. कानबाईला कन्हेरची फुले झेंडूची फुले फार आवडतात. अशी फुले मातेला वाहतात. आईला हिरवा शालू 'नाकात नथ कपाळी लाल कुंकु शोभून दिसत असतो. हे तेजस्वी बोलके रूप पाहून कानबाईपुढे लोटांगण घालत पारंपारिक गीताच्या ओळी गायल्या जातात.

कानबाईला पार्वती व कन्हेरला शंकराचं रूप मानतात.



शंकराला प्रसत्र करण्याचा हा महिना आहे. म्हणुन पार्वतीलाही साकडे घालून प्रसन्न करण्याचा दिवस मानतात. कानबाईच्या बाजूला कन्हेराला टोपी घालून बसवलेलं असतं या कानबाईच्या उत्सवात सर्व भाऊबंद रोट चा प्रसाद पुजण्यासाठी व रोट खाण्या साठी पवित्र भावनेने एकत्र येतात. रोटचे गहू पुर्वी जात्यावर घरीच दळत असत. महिला व पुरुष दोघे हातबार लावून दळत असत. दळण्या पासून तर आईची पारंपारिक गाणी म्हणण्यात पुरुष मंडळी आपला सहभाग नोंदवत होते. दळण दळणे आता तर सोपे झाले इलेक्ट्रिक चक्कीवर दळतात. खरं तर ही एक शोकांतिकाच आहे. मात्र देवीपुढे फुगड्या नाच गाणी यात भाऊबंद एकत्र येऊन रमतात. आपला राग, भेदभाव सर्व विसरतात हे वैशिष्टे या कानबाईमातेच्या उत्सवात बघायला मिळतात. आईचा प्रसाद मात्र लाह्या फुटाण्याचा असतो. कानबाईचा रोट खाण्या साठी भाऊबंदाच्या बाया बापडे मुले मुली यांना यावेच लागते. मात्र मुलगी विवाहित झाली की तिची कुलस्वामिनी बदलते. तिचे भाऊबंद विवाहित गावाचे असतात. मात्र ज्या भाऊबंदामध्ये कानबाई बसते तेथील भाऊबंद हा जरी विदेशात असला तरी तो रोट खायला आवर्जून येतो. रोट खायला मिळणं हे भाग्य समजलं जातं. रोट म्हणजे हा आईचा प्रसाद, त्यात पुरणाची पोळी, खीर , आमटी, फुनके, वडे, भात असा हा रोट नशीबवानालाच मिळतो.

रोट खाल्यावर हात बाहेर कुठेही धूता येत नाहीत. यासाठी मातीच्या घरात खड्डा खणला जातो. त्यातच हात धुतलेले पाणी टाकतात. हे पवित्र पाणी कुठेही पायदळ होऊ नये याची दक्षता घेतात.

रात्री नाचगाण्यात आईच्या भक्तीत सर्व रमून जातात. दुसर्या दिवशी सकाळी कानबाई आईला निरोप देतांना आईचा उदोउदो जयघोष करतात.

नवीन जोडपं कानबाईची पूजा करून तो चौरंग अंगणात आणतात. तत्पूर्वी गाईच्या शेणाने ती जागा सारवली जाते. सूर्याकडे तोंड करून तो चौरंग ठेवला जातो. पूजा करून दहीभात शिंपडतात.. मग सुवासिनीच्या डोक्यावर तो चौरंग ठेवतात. आणि डुबलीच्या तालावर बाजत गाजत नदीवर विसर्जनासाठी नेतात. विसर्जनास जातांना जर पाऊस नसला तर मिरवणूकच्या पुढे रस्त्यावर पाण्याचा शिडकाव करतात. मातेला गारवा देतात. भक्तांच्या अंगावरही पाण्याचा शिडकाव करतात. मातेला निरोप देतांना सुवासिनींचे,भाविकांचे डोळे पाणावतात. कानबाई चालनी गंगेवरी माय चालनी वं माय गंगेवरी साखर पेरत चालनी वं माय साखर पेरत चालनी असे पारंपारिक गाणे म्हणतात.



अशा रितीने कानबाई चा उत्सव खान्देशात फार उत्साहात साजरा केला जातो. आपणास जर कानबाई मातेचा निरोप आला तर आपण जरूर गेले पाहिजे.दिड दिवसाचा सण असतो पण वर्षभर पुरेल एवढी ऊर्जा देऊन जातो. आपले दैनदिन जीवनातील दुखः विसरून अशा आनंदाचा प्रत्येकाने लाभ घ्यावा. ''जय कानबाई माता की जय''

संकलन:- सुरेश मोरे
खर्दे बु. ता.शिदखेडा जि.धुळे
मो.नं.९८९०६२०९१७



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

माझा खान्देश

# राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

१५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. आपल्या भारत मातेला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्ती १९४७ ला याच दिवशी मिळाली. हा दिवस आपल्या देशाच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाणार दिवस आहे. स्वातंत्र्यासाठी लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या जीवाची आहूती दिली. असंख्य वीरांच्या बलिदानाने स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त झाला .त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वच्छंदपणे श्वास घेऊ शकतो. हा दिवस केवळ आनंदाचा नाही, तर जबाबदारीची जाणीव करून देणारा सुद्धा आहे. या दिवशी आपण देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या शुर क्रांतिकारकांना आणि त्यांच्या अतुलनीय त्यागाला आदरांजली वाहत असतो.

### स्वातंत्र्य सैनिक धनाजी नाना चौधरी

पूर्व खानदेशातील स्वातंत्र्य सैनिक धनाजी नाना चौधरी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झालेल्या राष्ट्रीय आंदोलनातील रचनात्मक आणि विधायक कार्यात अग्रणी राहिलेले आहेत. स्वातंत्र्य आंदोलनातील त्यांचे अतुल्य योगदान राहिले आहे.

सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या खिरोदा या गावातल्या शेतकरी कुटुंबात १४ मे १८९१ रोजी एका उदार व निरपेक्ष वृत्ती व व्यक्तिमत्व असलेल्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. परंपरागत समाजात असलेले मागासलेपण, समाज विकास व परिवर्तन शिक्षणाशिवाय होणार नाही अशी पुरोगामी भूमिका असलेल्या लेवा पाटीदार समाजात एक जागरूक पुरोगामी पित्याचा आदर्श धनाजी नाना यांना लाभला.धनाजी नाना यांचे प्राथमिक शिक्षण खिरोदे, भालोद , धुळे या ठिकाणी झाले. १९०७ ते १९१० काळात धुळे येथे व नंतर पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात धनाजी नाना चौधरी यांचे शिक्षण झाले. धुळे येथे शिक्षण घेत असताना त्यांच्या जीवनावर चांगले संस्कार झाले. राजकीय व सामाजिक चळवळी बद्दलची जाणीव होऊन, सुरुवातीला लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी चळवळीचा प्रभाव, सावरकरांच्या वाड्मयाचे आकर्षण, नाटकांची आवड यामुळे त्यांच्यात राष्ट्रीय वृत्ती वाढीला लागली. या काळात धुळे येथे क्रांतिकारक बाबू अरविंद घोष यांची मिरवणूक निघाली असताना कुठल्याही निर्बंधाचा विचार न करता धनाजी नाना मिरवणुकीत सामील झाले.



फर्ग्युसन महाविद्यालयात असताना धनाजी नाना यांनी खानदेशमधील मुलांचा 'खानदेश मराठा स्टुडंटस् क्लब' स्थापन करून विद्यार्थ्यांमध्ये एकात्म व संघटनात्मक भावना निर्माण केली. उच्च शिक्षणाची अपेक्षा आणि महत्वाकांक्षा परिस्थिती अभावी अपूर्ण राहिली. पुढे त्यांनी पी. टी. एस.चा कोर्स करून पोलीस खात्यात नोकरी स्वीकारली. या ठिकाणी आपल्या प्रामाणिकपणा, साधेपणा, कर्तव्य तत्परता आणि शुध्द चारित्र्य, सोज्वळ, निर्लोभी वृत्तीचे धनाजी नाना अधिकारी वर्ग आणि लोकांत प्रिय वाटू लागले. पोलीस खात्यात सेवा करीत असताना त्यांच्यातली राष्ट्रीय वृत्ती शांत बसू देत नव्हती. 'नोकरी हा अपघात आहे' असे ते नेहमी म्हणत असत. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्य लढ्यातून त्यांच्या मनात ब्रिटिश साम्राज्याबद्दलची चिड निर्माण झाली. समाजसेवेचे मूळ पिंड व राष्ट्रीय वृत्तीच्या धनाजी नाना यांनी नोकरीच्या बंधनातून होत राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय होण्याचे ठरवून महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी आंदोलनात टिळक स्वराज्य फंड,खादी प्रचार, मद्यपान बंदी, स्वदेशी चळवळ ह्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्याकाळी पोलीस खात्यात हवालदाराची नोकरी प्रतिष्ठेची गणली जाई. असे असताना त्यांनी नोकरी सोडली. नोकरी सोडण्याबाबत एखाद्याने विचारल्यावर ते म्हणत ''माझ्या गावात खादीचे काम करीन, चरखा चालवीन, राष्ट्रीय जागृती करीन. माझ्या सर्व कुटुंबाला स्वावलंबी बनवू शकलो तर मी जीवनाचे सार्थक झाले असे समजेल'' पुढे त्यांनी विलेपार्ले येथील छावणीत खादी शिक्षणासाठी सहकुटुंब सहभाग घेतला. चरखा हे गांधीजींच्या सर्व कार्याची केंद्र होते.धनाजी नाना यांनी खिरोदे या गावी सूतकताईचे केंद्र सुरू केले. त्यांचे घर 'सूतशाळा ' व खिरोदा 'लोकशिक्षणाचे केंद्र' म्हणून ओळखले जाऊ लागले. परंतु ब्रिटिश यंत्रणेची याकडे वक्रदृष्टी गेली.असहकार चळवळीच्या काळात १० जानेवारी १९३२ रोजी सरकारने खिरोदा आश्रम जप्त करून धनाजी नाना यांना अटक करण्यात येवून धुळे येथील तुरुंगात ठेवण्यात आले. खानदेशातील धुळे व धुळे कारागृह त्याकाळी स्वातंत्र्य चळवळीचे मुख्य केंद्र होते. त्या ठिकाणी विनोबा, साने गुरुजी, जमनालाल बजाज, शंकरराव कापरे या स्वातंत्र्य सैनिकांचा सहवास त्यांना लाभला. पुढे ठक्कर बाप्पा आणि काकासाहेब बर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली

पूर्व खानदेश हरिजन सेवक संघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. बहादरपूर -पारोळा या परिसरातील हिंदू मुस्लिम संबंधात निर्माण झालेला बेबनाव मिटवून संवाद- समन्वयातून त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्य व सर्वधर्मसमभाव निर्माण केली. सांस्कृतिक उन्नती व नागरिकांना मूलभूत हक्कांची जाणीव झाल्याशिवाय राष्ट्र प्रगतीपथावर जाणार नाही त्याकरिता आम जनतेसाठी लोकशिक्षणाचे कार्य हाती घेत त्यांनी जनता शिक्षण मंडळाची स्थापना करून अनेक विद्याशाखा सुरू केल्या. आज विविध विद्या शाखांतून हजारो विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत.

गांधीजींचे सच्चे कृतिशील अनुयायी म्हणून धनाजी नाना आयुष्यभर सेवावृत्तीने जगले. विनोबा, वल्लभभाई पटेल, जय रामदास दौलतराम, डॉ.राजेंद्र प्रसाद, किशोरलाल मशुमवाला, जमलालाल बजाज, महादेवभाई देसाई, मोरारजी देसाई, बाळासाहेब खैर, वैकुंठभाई मेहता, साने गुरुजी, काकासाहेब कालेलकर, शंकरराव देव ,काकासाहेब बर्वे, आप्पासाहेब पटवर्धन या गांधी निष्ठावंतांचा सहवास व मार्गदर्शन त्यांना मिळत राहिले. यातूनच ''खिरोदा मेरे लिए तीर्थक्षेत्र है'' असे उद्गार महात्मा गांधींनी १९३६ मध्ये काढले.

विधायक वृत्ती, त्याग,तरुणांना लाजवेल असा उत्साह आणि तळफ, नैतिक धैर्य आणि सहिष्णू वृत्ती, शिस्तबद्ध जीवन आणि साधी राहणी, निस्वार्थ सेवा ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची गुणवैशिष्ट्ये होती. सातपुडा लगतच्या खिरोदा आणि पाल परिसरात रचनात्मक विकासातून दलित आदिवासींचे जीवन समृध्द करण्याचा प्रयत्न करीत असताना समाजातील सावकार,कंत्राटदार आणि दारू व्यवसायात गुंतलेल्या हितसंबंधी माणसे त्यांच्या विरोधात गेली. यातूनच २९ डिसेंबर १९५२ रोजी रात्रीच्या सुमारास धनाजी नाना यांची त्यांच्याच राहत्या घरात निर्घृण हत्या झाली. त्यांच्या मृत्यूने खिरोदा आणि परिसरातील 'सर्वोदय योजनेचा आधारस्तंभ' व 'सर्वसामान्यांच्या मार्गदर्शक' काळाच्या पडद्यावर जणू गेला.

### फैजपुर अधिवेशन

फैजपुर अधिवेशन खानदेशातील एक महत्त्वाची व इतिहासात ठळक अक्षरात नोंदली गेलेली घटना. फैजपूर येथे डिसेंबर १९३६ मध्ये झालेले काँग्रेसचे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन. काँग्रेसचे इतिहासात ग्रामीण भागात झालेले काँग्रेसचे पहिले अधिवेशन अशी या अधिवेशनाची खरी ओळख सांगता येईल, अर्थातच या अधिवेशनाला सरकारचा व सरकारधार्जिन्या लोकांचाही विरोध होताच. त्याकाळी काँग्रेसचे प्रांतिक अध्यक्ष शंकरराव देव यांच्या आग्रहास्तव सुरुवातीला पूर्व खानदेशातील खिरोदा येथे डिसेंबरात अधिवेशन घेण्यात यावे असे ठरले,परंतु धनाजी नानांच्या सूचने वरून व्यवस्था व वाहतूकीच्या सोयीस्तव अधिवेशन फैजपूर येथे घेण्याचे ठरवून शंकरराव देव स्वागत समितीचे अध्यक्ष तर धनाजी नाना हे सरचिटणीस निवडले गेले. काँग्रेस अधिवेशनाचा प्रचार-प्रसार व तयारीसाठी राष्ट्रीय नेत्यांपासून खेड्यापाड्यांतील कार्यकर्ते जोमाने लागले. काकासाहेब गाडगीळ, विनोबा भावे, साने गुरुजी, एस. एम. जोशी, ग. प्र. प्रधान, ना. ग. गोरे, केशवराव जेधे, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यांनी गावची गावं पालथी घातली. धनाजी नाना, अण्णासाहेब दास्ताने, देवकीनंदन नारायण, राजमल लखीचंद, भाऊसाहेब बोंडे, सुकाभाऊ चौधरी, रामभाऊ भोगे, शंकर श्रीकृष्ण देव, नवल आनंदा पाटील, चुडामण अण्णा पाटील मंडळींनी खानदेशात गावोगावी जावून आवश्यक ते साहित्य उभे केले. दिड लाख लोक अधिवेशनासाठी आले. अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरु होते. हजारो हात एकत्र आले व अधिवेशन यशस्वीच नाही तर चिरस्मरणीय झाले. त्याकाळी लोक राष्ट्रीय भावनेने इतके भारलेले होते की माणसं कुठलाही त्याग करायला कचरत नसत. या अधिवेशनाने खानदेश ढवळून निघाला व स्वातंत्र्याची चळवळ अधिक लोकाभिमुख झाली. वकील, उच्च शिक्षितांपर्यंत मर्यादित असलेला स्वातंत्र्य लढा व काँग्रेस गावागावात, घराघरात जाऊन पोचली. त्याचे प्रत्यंतर १९४२ साली 'चले जाव' चळवळीत पाहायला मिळाले. महात्मा गांधींनी 'चले जाव' चा नारा दिला आणि अवघा देश पेटून उठला. शाळकरी मुलं रस्त्यावर येऊन प्रभात फेऱ्या, मिरवणूका काढू लागले. त्यातच नंदुरबार येथे शिरीषकुमार व त्याचे सहकारी ही कोवळी मुले हुतात्मा झाली. चले जाव चळवळीत खानदेशला पेटविण्याचे महत्त्वाचे कार्य साने गुरुजींनी केले. कुठे रेल्वे उलथविण्यात आली, कुठे सरकारी महसुल लुटला, कुठे सरकारी विश्रामगृह, पोस्ट ऑफीस, चावड्या पेटविण्यात आल्या. वाघळी येथे पेशावर एक्सप्रेस उलथविली गेली तर वाघोड स्टेशनजवळ पंजाब मेल पाडण्यात आली. विद्यार्थी दशेतील जी. बी. महाजन, लक्ष्मण चौधरी, अवचित देशमुख, सोनू आनंदा पंडीत यांनी पराक्रम केला. क्रांतीकारकांवर ब्रिटिश सरकार खटले भरले. ऑक्टोबर १९४२ ते डिसेंबर १९४२ या काळात खानदेशात पाचवेळा गोळीबार झाला, त्यापैकी चारवेळा पूर्व खानदेशात झाला आणि त्यात २७ हुतात्मा झाले. विद्यार्थी व शाळा चळवळीत सहभागी झाल्या, चाळीसगाव, जळगाव, अमळनेर व धुळे येथील कामगार सहभागी झाले. क्रांतीचा वणवा संपूर्ण देशभर पेटला.

---

## 'माझा खानदेश' वीर भूमिपुत्रांची प्रेरणादायी शौर्य गाथा

'आपला महाराष्ट्र'च्या 'बहर' पुरवणीत आमचे सन्मित्र डॉ. संजय ढोडरे यांच्या 'माझा खानदेश' या लेखमालेत खानदेशचा इतिहास, संस्कृती, स्वातंत्र्य चळवळीतील भूमिपुत्रांच्या त्याग, बलिदानाची शौर्यगाथा मांडण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे . स्वातंत्र्य चळवळीतील शिरीष कुमार व बालवीरांचे हौतात्म्य निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांनी दिलेले हौतात्म्य असीम त्याग, अभूतपूर्व शौर्य आणि बलिदानाची परिकाष्ठा होती. बालवीरांचे हे शौर्य स्वातंत्र्य चळवळीतील सर्वोच्च प्रतीक मानले जाते. डॉ. संजय ढोडरे हे खानदेश भूमीतील असल्याने त्यांनी बालवीरांची ही शौर्यगाथा अत्यंत प्रभावीपणे मांडली आहे. त्यांचे अध्ययन- अध्यापन-लेखन यातील सातत्य,संशोधनाची भक्कम बैठक, ओघवती भाषा आणि विषयाची सखोल मांडणी यांमुळे प्रत्येक लेखांतून आपल्या मातीतल्या समृद्ध इतिहास-परंपरेचा अभिमान जागृत होतो.धकाधकीच्या व धावपळीच्या या युगात स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक वारसा जतन करुन त्याचे महत्त्व अधोरेखित करणारी 'माझा खानदेश' लेखमाला निश्चितच कौतुकास्पद आहे. खानदेशचा समृद्ध इतिहास व सांस्कृतिक वारसा ,मातृभूमीबद्दल अभिमान आणि जिव्हाळा निर्माण करणारी ही लेखमाला खानदेशचे विविध पैलू जतन करून ते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम आहे. आपल्या पुढील लेखनासाठी हार्दिक शुभेच्छा!


**-प्राचार्य डॉ.महेंद्र रघुवंशी**
व्यवस्थापन परिषद सदस्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

----

## मातृभूमीवरील अपार प्रेमाचा जिवंत दस्तऐवज... 'माझा खानदेश'

दैनिक 'आपला महाराष्ट्र 'च्या 'बहर' पुरवणीत प्रकाशित होत असलेली 'माझा खानदेश' ही लेखमालिका मी नियमितपणे वाचत आलो आहे. 'माझा खानदेश' लेखमाला खानदेशच्या वैभवशाली इतिहास, समृद्ध संस्कृती, सामाजिक परंपरा, साहित्य-कला- लोकजीवन आणि मातृभूमीवरील अपार प्रेमाचा जिवंत दस्तऐवज आहे.

आजच्या धावपळीच्या आणि माहितीच्या प्रचंड गर्दीच्या युगात आपल्या मातृभूमीचा इतिहास, परंपरा, लोकसंस्कृती आणि महान व्यक्तिमत्त्वांचा इतक्या अभ्यासपूर्ण, संशोधनाधारित आणि सहजसुंदर भाषेत परिचय करून देणे, हे अत्यंत मोलाचे कार्य आहे. आपल्या लेखनातून केवळ माहिती मिळत नाही, तर खानदेशबद्दल अभिमानाची भावना जागृत होते. प्रत्येक लेख वाचतांना आपण आपल्या मातीतल्या इतिहासाशी आणि संस्कृतीशी पुन्हा नव्याने जोडले जातो. लेखमालिकेत खानदेश शब्दाची उत्पत्ती, नाम चर्चा, भौगोलिक वैशिष्ट्ये, ऐतिहासिक वारसा, संत परंपरा, सामाजिक चळवळी, साहित्य,




कला, लोकपरंपरा आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे कार्य यांचा डॉ.संजय ढोडरे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व अभ्यासपूर्ण मागोवा घेतला आहे. त्यामुळे ही लेखमालिका भविष्यातील संशोधक, विद्यार्थी व खानदेश प्रेमींसाठी निश्चितच उपयुक्त संदर्भ साहित्य ठरेल, अशी मला खात्री वाटते. साहित्य व लेखन क्षेत्रातील डॉ.संजय ढोडरे यांच्या दीर्घ अनुभवातून साकारलेल्या लेखमालेत त्यांनी साध्या- सहज-सोप्या -ओघवत्या आणि वाचकांना आपली वाटणारी भाषा प्रयोग, ही त्यांच्या लेखन शैलीची वैशिष्ट्ये सांगता येतील.त्यामुळे प्रत्येक लेख शेवटपर्यंत वाचण्याची उत्सुकता कायम राहते. प्रत्येक विषयामागील संशोधन, संदर्भांचा अचूक वापर आणि वस्तुनिष्ठ मांडणी यामुळे या लेखमालिकेचे साहित्यिक मूल्य अधिक उंचावले आहे. खानदेशची ओळख केवळ भौगोलिक मर्यादेत न ठेवता त्याच्या सांस्कृतिक अस्मितेला शब्दरूप देण्याचे कार्य आपण केले आहे. ही लेखमालिका म्हणजे खानदेशच्या गौरवशाली परंपरेला वाहिलेली शब्दांजली आहे. या उल्लेखनीय आणि समाज प्रबोधनात्मक उपक्रमासाठी आपले मनःपूर्वक अभिनंदन!... आपण असेच सातत्याने संशोधनपर आणि दर्जेदार लेखन सुरू ठेवावं... आपल्या पुढील साहित्यिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!..

**-डॉ.विनोद लोटन पाटील**
सेवानिवृत्त संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, धुळे

-----

## 'माझा खानदेश'... खानदेशच्या सांस्कृतिक अस्मितेचे जतन-संवर्धन...

'आपला महाराष्ट्र' या लोकप्रिय दैनिकाच्या 'बहर' पुरवणीतील 'माझा खानदेश' ही लेखमालिका म्हणजे खानदेशच्या इतिहास, संस्कृती, लोकजीवन आणि परंपरांचा जतन केलेला एक मौल्यवान शब्द ठेवा आहे. डॉ.संजय ढोडरे यांनी आपल्या अध्ययन-अध्यापन व संशोधन क्षेत्रातील दीर्घ अनुभवातून अभ्यासपूर्ण संशोधनात्मक व तथ्यपूर्ण मांडणी आणि ओघवत्या लेखन शैलीच्या आधारावर खानदेशच्या अनेक ज्ञात-अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकला आहे... लेखमालिकेच्या प्रत्येक अंकातून वाचकाला आपल्या भूमीचा इतिहास नव्याने समजतो...आपल्या मातीतल्या परंपरांविषयी अभिमान निर्माण होतो.ही लेखमालिका केवळ माहितीपर नाही, तर पुढील पिढीला आपल्या वारशाची ओळख करून देणारे आणि खानदेशच्या सांस्कृतिक अस्मितेचे जतन-संवर्धन करणारे एक महत्त्वपूर्ण कार्य आहे. एखादं कार्य हाती घेणे, वर्षभर त्यासाठी अमूल्य असा वेळ देऊन ते अतिशय चांगल्या पद्धतीने पूर्णत्वास नेणे, तसे कष्टप्रद असतेही... परंतु यातून मिळणारा आनंद आणि समाधान शब्दातीत असतो...डॉ.संजय ढोडरे यांनी लेखमालेसाठी निवडलेला विषय... त्यांची आपल्या खानदेश भूमीबद्दलची अस्मिता, प्रेम आपुलकी, आत्मीयता दर्शवणारी आहे. त्यांच्या उल्लेखनीय साहित्यिक आणि सामाजिक योगदानाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन...!

**-डॉ.किशोर सामुद्रे**
सेवानिवृत्त, सहाय्यक आयुक्त
पशुसंवर्धन, नंदुरबार

---



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

अर्थवेध

# आयकर कायदा -२०२५ अंतर्गत व्यवसायाच्या खाते पुस्तकांचे लेखा परिक्षण/ऑडिट

आयकर कायद्यांतर्गत व्यवसायाची निर्धारित उलाढाल/ विक्री ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या करदात्यांना त्यांच्या खात्यांचे चार्टर्ड अकाउंटंटकडून कर लेखापरीक्षण (Tax Audit) करून घेणे आवश्यक असते. करदात्याने आयकर कायद्यातील संबंधित तरतुदींचे पालन केले आहे की नाही, तसेच त्याची खाती योग्य व अचूक पद्धतीने ठेवण्यात आली आहेत की नाही, याची पडताळणी करण्याच्या प्रक्रियेला कर लेखापरीक्षण Tax Audit) असे म्हणतात.

आयकर कायद्यांतर्गत (कलम ६३) खातेपुस्तकांचे लेखापरीक्षण ही करप्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. या लेखापरीक्षणाचा मुख्य उद्देश करदात्याने आपल्या व्यवसायाचे व्यवहार योग्य पद्धतीने नोंदविले आहेत का, उत्पन्न व खर्चाची अचूक नोंद केली आहे का आणि आयकर कायद्यातील विविध नियम व तरतुदींचे पालन केले आहे का, हे तपासणे हा आहे.

कर लेखापरीक्षणाच्या माध्यमातून करदात्याच्या आर्थिक व्यवहारांची विश्वासार्हता आणि पारदर्शकता वाढण्यास मदत होते. तसेच, करदात्याला त्याचे आयकर विवरणपत्र (Income Tax Return) योग्य व अचूक पद्धतीने दाखल करण्यास मदत मिळते. चार्टर्ड अकाउंटंटकडून केलेल्या लेखापरीक्षणामुळे खात्यांमध्ये आढळणाऱ्या त्रुटी, विसंगती किंवा कायदेशीर अनुपालनातील त्रुटी वेळेत निदर्शनास येऊ शकतात.

या लेखामध्ये आयकर कायद्यांतर्गत कर लेखापरीक्षणाची संकल्पना, उद्देश, लागू होण्याच्या तरतुदी, उलाढालीच्या मर्यादा, लेखापरीक्षणाची प्रक्रिया, करदात्याच्या जबाबदाऱ्या, चार्टर्ड अकाउंटंटची भूमिका तसेच संबंधित कायदेशीर तरतुदी यांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

१) वकील, डॉक्टर, वैद्यकीय व्यवसायिक, अभियंता, आर्किटेक्ट, अंतर्गत सजावटकार (Interior Designer), अकाउंटंट, ऑडिटर आणि इतर पात्र व्यावसायिकांसाठी आयकर कायद्या अंतर्गत ऑडिट:

वकील, डॉक्टर, अभियंता, आर्किटेक्ट, अकाउंटंट, ऑडिटर, अंतर्गत सजावटकार आणि इतर पात्र व्यावसायिकांची वार्षिक एकूण व्यावसायिक प्राप्ती/ उलाढाल (Gross Receipts) ५० लाखांपेक्षा जास्त असल्यास, आयकर कायद्यानुसार त्यांच्या खात्यांचे Tax Audit (कर लेखापरीक्षण) करणे आवश्यक असते.

वरील व्यावसायिकांची वार्षिक व्यावसायिक प्राप्ती/ उलाढाल ५० लाखांपेक्षा कमी असल्यास आणि ते अनुमानित कर आकारणी योजना (Presumptive Taxation Scheme) स्वीकारण्यास पात्र असल्यास, ते या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेनुसार वार्षिक व्यावसायिक प्राप्तीच्या ५०% नफा म्हणून घोषित करून त्यानुसार आयकर भरल्यास, संबंधित अटी पूर्ण केल्याच्या परिस्थितीत आयकर कायद्या अंतर्गत लेखापरीक्षण ढु ओंवळीं करण्याची आवश्यकता राहत नाही.

**२) वरील व्यावसायिकांव्यतिरिक्त इतर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठी आयकर कायद्या अंतर्गत ऑडिट:**

वरील व्यवसायांव्यतिरिक्त इतर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, आर्थिक वर्षातील व्यवसायाची उलाढाल म्हणजेच वार्षिक विक्री १ कोटींपेक्षा जास्त असल्यास, आयकर कायद्यानुसार त्यांच्या खात्यांचे लेखापरीक्षण/ऑडिट Tax Audit करणे आवश्यक असते.

मात्र, या नियमाला एक महत्त्वाचा अपवाद आहे. जर करदात्याने कलम ५८(२), अनुक्रमांक १ अंतर्गत अनुमानित कर आकारणी योजना स्वीकारली असेल, तर संबंधित अटी पूर्ण केल्यास २ कोटीपर्यंतच्या वार्षिक उलाढालीपर्यंत लेखापरीक्षण/ऑडिट Tax Audit करण्याची आवश्यकता राहत नाही. त्यापेक्षा जास्त उलाढाल असल्यास, लागू असलेल्या तरतुदींनुसार व्यवसायाच्या खात्यांचे लेखापरीक्षण करणे करणे आवश्यक असते.

अनुमानित कर आकारणी योजना म्हणजे व्यवसायाच्या प्रत्यक्ष नफ्याचा तपशीलवार हिशोब करण्याऐवजी कायद्यात निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार विक्रीवर नफा घोषित करून त्यावर आयकर भरण्याची योजना होय. पात्र व्यवसायांच्या बाबतीत सामान्यतः विक्रीवर ६% किंवा ८% नफा गृहीत धरला जातो.

अनुमानित कर आकारणी योजनेसाठी पात्र असलेल्या करदात्याला कायद्यात निश्चित केलेल्या विक्रीवर ६% किंवा ८% पेक्षा कमी नफा दाखवायचा असल्यास, लागू असलेल्या अटींनुसार नियमित खातेपुस्तके ठेवणे आणि कलम ६३ अंतर्गत Tax Audit ऑडिट करून घेणे करणे आवश्यक असते.

ज्या व्यवसायामध्ये ९५% किंवा त्यापेक्षा जास्त व्यवहार ऑनलाइन किंवा डिजिटल स्वरूपात होतात आणि रोख व्यवहार कायद्यात निर्धारित केलेल्या मर्यादेत असतात, अशा व्यवसायांसाठी ऑडिट Tax Audit ची मर्यादा सामान्य १ कोटीऐवजी १० कोटीपर्यंत असते. म्हणजेच, जर व्यवसायातील रोख व्यवहार एकूण उलाढालीच्या ५% पेक्षा जास्त नसतील, तर लागू असलेल्या इतर अटी पूर्ण झाल्यास ऑडिट Tax Audit ची उच्च मर्यादा १० कोटीपर्यंत लागू होऊ शकते. त्यापेक्षा जास्त उलाढाल झाल्यास व्यवसायाच्या खातेपुस्तकांचे Tax Audit करणे आवश्यक असते.




आयकर कायदा, २०२५ च्या कलम ६३ नुसार ज्या करदात्याला आपल्या व्यवसायाच्या किंवा व्यवसायिक सेवांच्या लेखापुस्तकांचे कर लेखापरीक्षण (Tax Audit) करणे आवश्यक आहे, परंतु त्याने लेखापरीक्षण करून घेतले नाही किंवा कलम ६३ नुसार आवश्यक असलेला लेखापरीक्षण अहवाल निर्धारित मुदतीत सादर केला नाही, तर कलम ४२८(ल) अंतर्गत दंड (Fee) भरावे लागते. लेखापरीक्षण करण्यास १ महिन्यापर्यंत उशीर झाल्यास ७५,००० दंड आणि १ महिन्यापेक्षा जास्त उशीर झाल्यास १,५०,००० दंड भरावे लागते. हे शुल्क लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यापूर्वी भरावे लागते.

कर लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची अंतिम मुदत काय आहे ?

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ज्यांना त्यांच्या व्यवसायाच्या खातेपुस्तकांचे Tax Audit (कर लेखापरीक्षण) करणे आवश्यक आहे, त्यांनी कर लेखापरीक्षण अहवाल संबंधित कर वर्षाच्या ३० सप्टेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर, ज्या करदात्यांना कर लेखापरीक्षण/ ऑडिट Tax Audit लागू आहे, त्यांनी त्यांचा Income Tax Return (ITR) ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल करणे आवश्यक असते.

**व्यवसायाच्या लेखापुस्तकांचे लेखापरीक्षण न केल्यास दंड :-**

टॅक्स ऑडिट रिपोर्ट विहित नमुन्यात दाखल करणे :-

आयकर कायद्यानुसार, ज्या करदात्याच्या व्यवसायाचे किंवा व्यवसायिक सेवांचे कर लेखापरीक्षण (Tax Audit) करणे आवश्यक आहे, त्या करदात्याच्या वतीने नियुक्त केलेल्या चार्टर्ड अकाउंटंटने (CA) विहित फॉर्म क्रमांक २६ मध्ये कर लेखापरीक्षण अहवाल तयार करून तो इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आयकर विभागाच्या पोर्टलवर सादर करणे आवश्यक असते. अहवाल सादर केल्यानंतर करदात्याने तो अहवाल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मंजूर करणे आवश्यक असते.

कर लेखापरीक्षण अहवालाला मंजुरी देण्यासाठी करदात्याची Digital Signature Certificate (DSC) आवश्यक असते. मात्र, चालू वर्षापासून वैयक्तिक करदाता (Individual) आणि हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) यांच्या कर लेखापरीक्षण अहवालाला Aadhaar OTP द्वारे देखील मंजुरी देता येते. त्यामुळे खपवर्ळींळर्वीरश्र आणि क्षऊऋ करदात्यांसाठी कर लेखापरीक्षण अहवाल मंजूर करण्यासाठी DSC सोबत Aadhaar OTP हा पर्यायही उपलब्ध आहे.

**व्यवसायाच्या खाते पुस्तकांचे ऑडिट करण्यापूर्वी नियोजन :-**

साधारणपणे ज्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल म्हणजेच विक्री १ कोटीच्या आत असते, त्या व्यवसायातील करदाते अनेक वेळा संपूर्ण आणि नियमित पद्धतीने खातेपुस्तके तयार करीत नाहीत. ते प्रामुख्याने आवश्यक खरेदी-विक्रीची बिले तयार करून ठेवतात आणि अनुमानित कर आकारणी योजनेचा (Presumptive Taxation Scheme) लाभ घेतात.

परंतु जेव्हा करदात्याच्या व्यवसायाची उलाढाल वाढून Tax Audit लागू होते, तेव्हा लेखापरीक्षणासाठी व्यवसायाशी संबंधित सर्व आवश्यक कागदपत्रे व्यवस्थित उपलब्ध असणे आवश्यक असते. यामध्ये खरेदीची बिले, विक्रीची बिले, खर्चाची बिले व व्हाउचर्स, बँक स्टेटमेंट, रोख व्यवहारांची नोंद आणि इतर आवश्यक कागदपत्रांचा समावेश होतो. या कागदपत्रांच्या आधारे व्यवसायाची योग्य खाती तयार केली जातात. त्यानंतर ताळेबंद (Balance Sheet) आणि नफा-तोटा पत्रक (PA°ofit and Loss Account) तयार करून संपूर्ण खातेपुस्तके कर लेखापरीक्षण Tax Audit साठी सादर केली जातात.

त्यामुळे प्रत्येक व्यवसायिकाने आपल्या व्यवसायाची स्थिती लक्षात घेऊन वर्षाच्या सुरुवातीपासूनच सर्व आवश्यक कागदपत्रे व्यवस्थित जतन करावीत. यामुळे कर लेखापरीक्षण Tax Audit च्या वेळी कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. आवश्यक कागदपत्रे कोणती आहेत यासाठी व्यवसायिकाने आपल्या चार्टर्ड अकाउंटंटचा सल्ला घेऊन वर्षभर योग्य नोंदी ठेवाव्यात.

आयकर कायद्यानुसार व्यवसायाच्या खातेपुस्तकांचे कर लेखापरीक्षण ढर ओंवळीं हे कर कायद्याचे पालन आणि योग्य पद्धतीने खपलोश Tax Return दाखल करण्यासाठी महत्त्वाचे आहे. योग्य कागदपत्रे आणि लेखा नोंदी वेळेवर तयार केल्यामुळे कर लेखापरीक्षण ओंवळीं प्रक्रिया सुलभ होते. तसेच, कर लेखापरीक्षण Tax Audit अहवाल निर्धारित मुदतीत सादर करणे आवश्यक असल्यामुळे प्रत्येक व्यवसायिकाने वेळेवर कागदपत्रांची पूर्तता करून आपल्या चार्टर्ड अकाउंटंटच्या मदतीने कर लेखापरीक्षण Audit प्रक्रिया पूर्ण करावी.वरील कर लेखापरीक्षण Tax Audit च्या तरतुदी प्रामुख्याने वैयक्तिक करदाते/ Individual आणि HUF हिंदू अविभक्त कुटुंब करदाते यांना लागू आहेत; ट्रस्ट, संस्था आणि कंपनी यांच्या लेखापरीक्षणासाठी स्वतंत्र कायदे व वेगवेगळ्या लेखापरीक्षणाच्या तरतुदी लागू होतात.



# स्मृतिरुप आई

श्रावण महिना सुरु झाला की, मला आईची सोज्वळ प्रेमळ मूर्ती डोळ्या समोर येते. तिच्या आठवणीने डोळे पाणावतात. साधारणतः परिस्थितीत संसाराचा तोल सावरत नाती जपत, तिने मनात माणूसकीचा दीवा सतत प्रज्वलित ठेवला. प्रतिकुल परिस्थितीत सुध्दा निःस्वार्थी सेवेचे धडे आईने दिले. ''लहानपणीचे दिवस सुखाचे आठवती घडी घडीं''.



आम्ही तीन भाऊ, पाच बहिणी, आईला अक्का म्हणत, एकत्र कुटूंब, पाहुण्याचा नित्य राबता (पंचवटी तिर्थक्षेत्र असल्याने) वडलांची खासगी नोकरी, तुटपुंज्या आमदनीत सुध्दा आक्काने आदरातिथ्याचा, प्रसन्नतेचा हात कधीही आखडता घेतला नाही. संस्कारी मुले हिच खरी संपत्ती व ''कुणा ना व्यर्थ हिणवावे, सर्वांना प्रेम अर्पावे'' हेच तिचे जीवन सूत्र होते.

''श्रावणातील पहिल्या दिवसापासूनच परोपकारात खरे पुण्य आहे'', हे सांगण्यासाठी प्राचीन परंपरेनुसार कहाण्या आक्का – शनिचौक परिसरात आपल्या रसाळ वाणीने कथन करण्याचे सामाजिक व्रत तिने घेतले होते. त्याची सुरवात अन्धृटकर आजींच्या घरापासून झाल्याचे स्मरते.

कहाण्यातील सुगम, रसाळ, सुटसुटीत भाषाशैली, सांगण्याची पध्दत, कथन करतांना तिच्या भावमुद्रा हे श्रवण करतांना श्रोता–कथेशी प्रसंगाशी एकरुप होत असे. कहाण्यातील आटपाट नगर–निर्मळ मळे, उदकांचे तळे, बेलाचा वृक्ष, सुवर्णाची कमळे, विनायकाची देवळे, नागकन्या, देवकन्या, बाबा बाबा गुळ खा, पाणी प्या, बोडण भरणे, सप्त अप्सरा, धर्मकन्या, जलदेवता, उःशाप दासी, बटकी–खुलभर दूध, उतशील, मातशील, घेतला वसा टाकून देशील, साठा उत्तराची कहाणी–पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण. ह्या शब्दाभोवती गुंफलेल्या कथा त्याच्या अविट गोडव्याने मंन आजही भुतकाळात रमून जाते.

दुसऱ्याला मदत करण्यासारखे पुण्य नाही असा साध्या सरळ सात्विक विचारांचा, आचारांचा वसा घेवून आईने आपले जीवित कार्य समृध्द केले.

सदाचाराचा अमृतस्पर्श आईने आमच्या नेत्री लावला, समाजसेवेचा आशिर्वाद दिला. अशा आईच्या ऋणात राहाण्याचा आनंद चिरंजीव व्हावा.

॥ मातृदेवो भव ॥

–भास्कर, दीपक, विश्वास मदाने परिवार
सौ. आशा अरविंद काळे

# स्वातंत्र्याची ८० वर्षे : पायाभूत सुविधांच्या बळावर विकसित भारताकडे!

(पान ३ वरुन) इलेक्ट्रिक मोबिलिटी, ड्रोन नेटवर्क आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा व्यापक वापर – हे सर्व भारताच्या विकासाचे नवे आधारस्तंभ असतील. जागतिक पुरवठा साखळीत भारताचे स्थान अधिक मजबूत होऊ शकते. उत्पादन, संरक्षण उद्योग, सेमीकंडक्टर, हरित ऊर्जा, अंतराळ तंत्रज्ञान आणि डिजिटल सेवा या क्षेत्रांत भारत जगातील प्रमुख केंद्रांपैकी एक बनू शकतो. परंतु त्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक, धोरणात्मक नियोजन आणि कौशल्य विकास आवश्यक असेल.

**विकसित भारताचा सर्वात मोठा आधार : जेन झी**

पुढील वीस वर्षांत भारताच्या प्रगतीतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे जेन झी पिढी. आजची ही तरुण पिढी २०४७ पर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचे, उद्योगांचे, संशोधनाचे, प्रशासनाचे आणि तंत्रज्ञान क्षेत्राचे नेतृत्व करणार आहे. या पिढीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची डिजिटल साक्षरता आणि तंत्रज्ञानाशी असलेली सहज नाळ. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा ॲनालिटिक्स, ऑटोमेशन, डिझाइन, स्टार्टअप संस्कृती, कंटेंट इकॉनॉमी आणि जागतिक स्पर्धा यांचा अनुभव या पिढीला लहानपणापासून मिळाला आहे.

जेन झी ही केवळ नोकरी शोधणारी पिढी नाही; ती रोजगार निर्माण करणारी, नवोपक्रम करणारी आणि जागतिक बाजारपेठेत भारतीय कंपन्यांना स्पर्धात्मक बनवणारी पिढी ठरू शकते. स्टार्टअप, डीप–टेक, हेल्थ–टेक, ॲग्री–टेक, फिनटेक, हरित ऊर्जा आणि रोबोटिक्स या क्षेत्रांत भारताला पुढे नेण्याची क्षमता या पिढीत आहे.

परंतु या क्षमतेला दिशा देण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत बदल, कौशल्य विकास, संशोधन, उद्योजकता आणि उद्योग–शिक्षण यांच्यातील दुवा मजबूत करावा लागेल. भारताचा लोकसंख्यात्मक लाभ (वशोसॲरहिळल वळींळवशपव) तेव्हाच आर्थिक शक्तीत रूपांतरित होईल.

**पायाभूत सुविधा आणि मानवी भांडवल**

एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. पायाभूत सुविधा म्हणजे केवळ काँक्रीट, स्टील आणि डांबर नाही. मानवी भांडवल ही देखील पायाभूत सुविधांचीच एक व्यापक संकल्पना आहे. चांगली शाळा, महाविद्यालये, संशोधन संस्था, आरोग्य सुविधा, डिजिटल शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण यांमध्ये गुंतवणूक केल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही.म्हणूनच भौतिक पायाभूत सुविधा आणि मानवी पायाभूत सुविधा यांची सांगड घालणे ही पुढील वीस वर्षांची सर्वात मोठी राष्ट्रीय गरज असेल.

**२०४७ चे ध्येय**

स्वातंत्र्याच्या पहिल्या ८० वर्षांत भारताने पायाभूत सुविधांचा मजबूत पाया घातला. पुढील २० वर्षांत त्या पायावर विकसित भारताची इमारत उभी राहील. रस्ते, रेल्वे, बंदरे, ऊर्जा, पाणी, डिजिटल नेटवर्क आणि कुशल तरुणाई यांची सांगड घातली, तर भारत केवळ आर्थिक महासत्ता नव्हे, तर समावेशक, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित विकसित राष्ट्र बनू शकतो.आज भारतासमोर एक ऐतिहासिक संधी आहे. १९४७ ते २०२७ हा काळ राष्ट्रनिर्मितीचा होता; २०२७ ते २०४७ हा काळ राष्ट्रपरिवर्तनाचा असू शकतो. ८० वर्षांचा प्रवास आपल्याला एक स्पष्ट संदेश देतो – राष्ट्रे घोषणांनी नाही, तर पायाभूत सुविधांनी उभी राहतात. आणि २०४७ च्या भारताला आकार देणारी सर्वात मोठी शक्ती असेल – भक्कम पायाभूत सुविधा, कुशल मानवी भांडवल आणि नव्या भारताची जेन झी पिढी. हाच विकसित भारताच्या शतकाचा खरा पाया असेल.




**डॉ.रोहन कुलकर्णी**
MBBS, MD Medicine, IDCCM
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
जवाहर एसीपीएम मेडिकल हॉस्पिटल,
साक्री रोड, धुळे. मो.९५०३४२०५१२

# मान्सूनमध्ये वाढणारे व्हायरल ताप साधा ताप समजून दुर्लक्ष करू नका!

प्रस्तावना– पावसाळा सुरू झाला की वातावरणात आर्द्रता वाढते, पाणी साचते आणि विविध विषाणूंचा प्रसार वेगाने होतो. त्यामुळे व्हायरल तापाची प्रकरणे मोठ्या प्रमाणात वाढतात. अनेकजण तापाला ''साधा फ्लू'' समजून औषधे घेत राहतात. मात्र काही वेळा हा ताप डेंग्यू, चिकुनगुनिया, इन्फ्लूएंझा किंवा इतर गंभीर संसर्गाचे सुरुवातीचे लक्षण असू शकतो. त्यामुळे प्रत्येक तापाकडे योग्य दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे.

हा विषय सध्या महत्त्वाचा का?

सध्या पावसाळ्याच्या काळात देशभरात तापाच्या रुग्णांची संख्या वाढलेली दिसून येते. शाळा, कार्यालये, सार्वजनिक वाहतूक आणि गर्दीच्या ठिकाणी विषाणूंचा प्रसार अधिक वेगाने होतो. वेळेवर निदान आणि योग्य उपचार केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते तसेच संसर्गाचा प्रसारही कमी करता येतो.

कारणे– व्हायरल ताप हा विविध प्रकारच्या विषाणूंमुळे होतो. त्याचा प्रसार मुख्यतः संक्रमित व्यक्तीच्या शिंकणे, खोकणे, हातांचा संपर्क किंवा दूषित वस्तूंना स्पर्श केल्यानंतर होतो. काही विषाणू डासांमार्फतही पसरतात. कमी प्रतिकारशक्ती, अपुरी झोप, अस्वच्छता आणि गर्दीच्या ठिकाणी वारंवार वावर यामुळे संसर्गाचा धोका वाढतो.


लक्षणे– अचानक ताप येणे, अंगदुखी व सांधेदुखी, डोकेदुखी, घसा खवखवणे, सर्दी किंवा खोकला, थकवा व अशक्तपणा, भूक कमी लागणे, काही रुग्णांमध्ये मळमळ किंवा उलट्या

कोणाला जास्त धोका?

लहान मुले, ६० वर्षांवरील नागरिक, गर्भवती महिला, मधुमेह, हृदयरोग, मूत्रपिंड किंवा फुफ्फुसाचे आजार असलेले रुग्ण, कर्करोग किंवा कमी प्रतिकारशक्ती असलेले व्यक्ती, आरोग्यसेवक आणि गर्दीच्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी.

परिणाम व गुंतागुंत– बहुतेक व्हायरल ताप काही दिवसांत बरा होतो. परंतु काही रुग्णांमध्ये न्यूमोनिया, शरीरातील पाण्याची कमतरता, रक्तदाब कमी होणे, प्लेटलेट्स कमी होणे, श्वसनाचा त्रास किंवा इतर अवयवांवर परिणाम होऊ शकतो. वृद्ध आणि गंभीर आजार असलेल्या रुग्णांमध्ये धोका अधिक असतो.

धोक्याची चिन्हे– खालील लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या: श्वास घेण्यास त्रास, सतत १०३ओऋ किंवा



त्यापेक्षा जास्त ताप, बेशुद्धपणा किंवा गोंधळ, रक्तस्त्राव किंवा त्वचेवर लाल ठिपके, वारंवार उलट्या, लघवी कमी होणे, छातीत दुखणे.

निदान व तपासण्या– डॉक्टर रुग्णाची लक्षणे, तपासणी आणि आजाराचा इतिहास लक्षात घेऊन आवश्यक तपासण्या सुचवतात. त्यामध्ये रक्त तपासणी, पूर्ण रक्तचित्र (उइउ), गरजेनुसार डेंग्यू, मलेरिया किंवा इतर संसर्गाच्या चाचण्या तसेच छातीचा एक्स–रे किंवा इतर तपासण्या केल्या जाऊ शकतात.

उपचार– बहुतेक व्हायरल तापामध्ये पुरेशी विश्रांती, द्रवपदार्थ, ताप कमी करणारी औषधे आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार पुरेसे असतात. प्रतिजैविक (अँटिबायोटिक) औषधे प्रत्येक व्हायरल तापामध्ये उपयोगी नसतात. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटिबायोटिक्स घेऊ नयेत. गंभीर रुग्णांना रुग्णालयात दाखल करून विशेष उपचारांची गरज लागू शकते.

घरच्या घरी काळजी– – भरपूर पाणी, सूप, ताक किंवा इतर द्रवपदार्थ घ्या. – पुरेशी विश्रांती घ्या. – हलका व पौष्टिक आहार घ्या. – ताप नियमित मोजा. – स्वतःहून औषधे बदलू नका. – लक्षणे वाढल्यास त्वरित डॉक्टरांकडे जा.

प्रतिबंधात्मक उपाय– वारंवार साबणाने हात धुवा. खोकताना किंवा शिंकताना रुमाल किंवा कोपराचा वापर करा. गर्दीच्या ठिकाणी आवश्यक असल्यास मास्क वापरा. पुरेशी झोप आणि संतुलित आहार घ्या. डासांची पैदास होणार नाही याची काळजी घ्या. आजारी असल्यास इतरांपासून योग्य अंतर ठेवा.

गैरसमज विरुद्ध सत्य

गैरसमज: प्रत्येक तापात अँटिबायोटिक घ्यावी लागते.

सत्य: व्हायरल तापामध्ये अँटिबायोटिक नेहमी आवश्यक नसते.

गैरसमज: ताप उतरला म्हणजे पूर्ण बरे झाले.

सत्य: काही संसर्गांमध्ये गुंतागुंत नंतरही होऊ शकते.

गैरसमज: तापात पाणी कमी प्यावे.

सत्य: तापात शरीरातील पाण्याची गरज वाढते.

डॉक्टरांचा सल्ला– दोन ते तीन दिवसांपेक्षा जास्त ताप राहणे, श्वास घेण्यास त्रास होणे, रक्तस्त्राव, तीव्र अशक्तपणा किंवा इतर गंभीर लक्षणे दिसल्यास विलंब न करता डॉक्टरांकडे जा. स्वतः औषधे घेण्यापेक्षा योग्य तपासणी करून उपचार सुरू करणे अधिक सुरक्षित असते.

भारत व जगातील परिस्थिती– पावसाळ्यात भारतात दरवर्षी व्हायरल ताप, डेंग्यू, चिकुनगुनिया आणि इन्फ्लूएंझाच्या रुग्णसंख्येत वाढ दिसून येते. जगभरातही ऋतूनुसार श्वसनविषयक विषाणूंचे संक्रमण वाढते. हवामानातील बदल, वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणामुळे संसर्गजन्य आजारांचे आव्हान अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि लसीकरण यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

५ झटपट आरोग्य टिप्स– १. ताप आला तर भरपूर पाणी प्या आणि विश्रांती घ्या. २. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटिबायोटिक घेऊ नका. ३. हातांची स्वच्छता आणि खोकताना शिष्टाचार पाळा. ४. ताप तीन दिवसांपेक्षा जास्त राहिल्यास तपासणी करून घ्या. ५. डासांची पैदास रोखण्यासाठी घर व परिसर स्वच्छ ठेवा.

निष्कर्ष– व्हायरल ताप हा बहुतेक वेळा सौम्य असला तरी काही वेळा तो गंभीर संसर्गाचे सुरुवातीचे लक्षण असू शकतो. योग्य वेळी निदान, पुरेशी विश्रांती, योग्य उपचार आणि स्वच्छतेच्या सवयी यामुळे बहुतेक रुग्ण पूर्णपणे बरे होतात. पावसाळ्यात तापाकडे दुर्लक्ष करू नकावेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि स्वतःसह आपल्या कुटुंबाचेही संरक्षण करा.

# लोककल्याणकारी शासन व्यवस्थेचे निर्माते

**(पान ३ वरुन)** दिली जात असे. महाराजांच्या न्यायी वृत्तीचा आणि कर्तव्य कठोरतेचा दरारा सर्वत्र होता. स्त्रीयांवरील अत्याचार करणाऱ्यांच्या बाबतीत तर महाराजांनी कठोर भूमिका स्विकारून कडक शिक्षा केल्या. त्यांचे परस्त्री मातेसमान लेखणारे,शत्रूपक्षाकडील स्त्रीयांचाही सन्मान करणारे प्रगतिशील विचार श्रेष्ठ असे आहेत.

छत्रपती आपल्या प्रजेला नेहमी सांगत असत की भावा–भावामध्ये घरातील प्रश्नावरून किंवा शेतीच्या वाटणीवरून आप–आपसात भांडू नका यातून पिढ्यान पिढयाचे वैरत्व वाढते. त्यातुन खुन व मारामाऱ्या होतात. म्हणून महाराज हे होऊ नये म्हणून स्वतः लक्ष घालीत असत.त्यामुळे कोणत्याही प्रकारचा तंटा निर्माण न होता शांतता निर्माण होत असे.वडिलांच्या मृत्यूनंतर जर मुलगा नसेल तर मुलीला आपला वडिलोपार्जित मालमत्तेचा हक्क मिळत असे.ऐवढेच नव्हेतर मुलाला व मुलीला दोघानांही मालमत्तेचा समान वाटा देण्याची तरतुद केली होती.

छत्रपती शिवाजी महाराज हे आजही धुव्रताऱ्या प्रमाणे जगाच्या इतिहासात सतत तळपत आहेत. कॉस्मो–दा–गार्डाने महाराजांच्या आदर्श शासन व्यवस्थेची, न्यायनिष्ठूरतेची आणि कार्यक्षम अधिकाऱ्यांच्या गुणांची पारक करून त्यांचा योग्य तो सन्मान करण्याच्या वृत्तीची प्रशंसा केली आहे.छत्रपतींनी १७ व्या शतकामध्ये सर्व सामान्य जनतेच्या न्यायासाठी गुन्हेगाराला मृत्युदंडाची शिक्षा देऊन आदर्श शासनव्यवस्था निर्माण केली. त्यांनी भारत देशामध्ये स्वतंत्र व सार्वभौम असे स्वराज्य उभारले. स्वराज्यामध्ये कायद्यासमोर सर्व समान हा मानदंड उभा केला.छत्रपतींच्या न्यायव्यवस्थेप्रमाणे सर्व सामान्यांना न्याय दिला पाहिजे.आज लोकशाही मुल्यांवर आधारित असलेल्या प्रशासनाला बळकटी देणे हेच छत्रपतींच्या शासन व्यवस्थेचे श्रेष्ठत्व आहे.



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी काही अडचणींचा आणि अडथळ्यांचा असणार आहे. कदाचित संभाषण व्यवस्थित होणार नाहीत, व्यवहार चोख होणार नाहीत. आरोग्याच्या तक्रारी उद्भवू शकतात. ताणतणाव जास्त जाणवू शकतो. पण परिस्थिती तुमच्या हातात नसेल पण मनः स्थिती नक्कीच तुमची तुम्हीच सुधारू शकता! या आठवड्यात तुम्हाला तुमच्या सकारात्मकतेचा कस लावावा लागणार आहे. हातपाय गाळून बसू नका. तुमच्याकडे कौशल्य आहे, शक्ती आहे, त्यांचा नीट वापर करा. ''मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण!'' हे तुकोबांचे वचन लक्षात ठेवा!

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी मागे केलेल्या कामाचे चांगले फळ घेऊन येत आहे. कष्टाचं चीज होईल. लोकांकडून तुमचं कौतुक होण्याची शक्यता आहे. तुम्हाला हवं असलेलं नाव, हुद्दा, मान सन्मान, बक्षिस हे या सप्ताहात मिळू शकतात. एखादं अडकलेलं काम मार्गी लागेल. या आठवड्यात तुम्हाला तुमचे पाय जमिनीवर ठेवण्याची गरज आहे. लोकांनी मान दिला, मोठं केलं तर त्यांना खाली पाडू नका. त्यांना एकत्र घेऊन पुढे चाला. आदर्श नेतृत्व करा. अरेरावी करू नका. काही लोक तुमचा दुस्वास करू शकतात, पण तुम्ही त्यांची निंदा करु नका, त्यांना हिणवू नका!

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक, आर्थिक समाधानाचा असणार आहे. जे पाहिजे ते मिळण्याची खूप शक्यता आहे. एखादं लहान ध्येय पूर्ण होईल. आर्थिक धनलाभ सुद्धा होऊ शकतो. कुटुंबामध्ये काही कारणाने आनंद राहील, एकोपा राहील. सगळे जण मिळून कुठल्यातरी आनंदात सहभागी होतील. ज्येष्ठ व्यक्ती किंवा नातेवाईकांच्या भेटीगाठी होतील. या आठवड्यात तुम्ही तुमच्या ध्येयावर पूर्ण मेहनत करण्याची गरज आहे. शेवटचा टप्पा आला आहे, चिकाटीने पुढे चाला. आपल्या माणसांवर किंवा आवडीच्या वस्तूवर पैसे खर्च करा, त्यात काही चूक नाही, फक्त अतिरेक नको!

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या वळणाचा आहे. एक प्रकारे विरक्ती आणणारा हा काळ असू शकतो. कष्टाचे हवे तसे फळ मिळणार नाही. विलंब होईल. पण यामुळेच तुम्ही अंतर्मुख व्हाल आणि नवीन मार्ग सापडेल! परिस्थितीचा स्वीकार करुन आनंदाने मार्गक्रमण कराल. निरस व्हाल पण निराश नाही! स्वार्थ सोडून परमार्थाचा विचार येईल. या आठवड्यात तुम्ही विवेकबुद्धी आणि धीराने वागा. आत्मोन्नतीचा मार्ग शोधा. इतरांकडून फार अपेक्षा ठेवू नका, त्या पूर्ण होणार नाहीत. भौतिक पसाऱ्यातून स्वतःला थोडे अलिप्त करून बघा. एकांतात वेळ घालवा.

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी भावनांचे प्राधान्य घेऊन येत आहे. घरात किंवा नोकरीमध्ये लोकांचा प्रभाव राहील. समजून घेणारे लोक भेटतील. तुमच्या कलेला वाव मिळेल. काही प्रमाणात राजकारण घडू शकतं. कामामध्ये एक प्रकारचा टप्पा गाठला जाईल. या आठवड्यात तुम्हाला तुमचं वागणं बोलणं चांगलं आणि सुसंस्कृत ठेवण्याची गरज आहे. ऐकावं जनाचं करावं मनाचं, याप्रमाणे वागा. मोठ्यांसमोर नमतं घ्या. कोणालाही हिणवू नका. कोणा अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन मग निर्णय घ्या. तुमच्या जवळच्या व्यक्तींची चांगली काळजी घ्या!




**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे, शक्ती आणि सामर्थ्य देणारा आहे. तुमचा आत्मविश्वास चांगला राहील, इच्छाशक्ती भक्कम राहील. कोणतीही समस्या सोडवायला तुम्हाला योग्य मार्ग सुचतील. या आठवड्यात तुमच्यासाठी सगळ्यात महत्त्वाचे आहे संसाधनांचा योग्य उपयोग. काहीही वाया घालवू नका आणि कशाचाही अतिवापर करू नका. बुद्धीने निर्णय घ्या, भावनांमध्ये अडकू नका. ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी लवचिक आणि चपळ रहा. ''जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला'' हे लक्षात ठेवून स्वावलंबी व्हा!

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी निवांत वेळ घेऊन येत आहे. तुमच्या आवडीचं काहीतरी करु शकाल. एखादा आनंदाचा कार्यक्रम होईल. मागे केलेल्या कष्टाचे फळ काही प्रमाणात मिळेल. लहानसा उत्सव साजरा कराल. समारंभामध्ये सहभागी व्हाल किंवा तुम्ही स्वतः तुमच्या आवडीच्या लोकांशी भेटी होतील. एकमेकांना सहाय्य कराल. तब्येत सुधारेल. या आठवडयात तुम्ही एकटे राहू नका, लोकांना भेटायला जा. मन मोकळे हसा आणि मन मोकळे बोला. लोकांचे मत जाणून घ्या, त्यांना बोलतं करा. तुमच्या जवळच्या माणसांशी आवर्जून संवाद साधा. स्वार्थबुद्धी सोडा.

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी बऱ्याच गोष्टी एकाच वेळी घेऊन येणार आहे. त्यामुळे तुमची तारांबळ उडू शकते. तुम्हाला ओझं वाहून नेत असल्याप्रमाणे वाटू शकतं. एक प्रकारचं दडपण आणि ताण येऊ शकतो. पण हा शेवटचा टप्पा आहे हे लक्षात ठेवा! या आठवड्यात तुम्ही अनेक गोष्टी स्वतःवर ओढवून घेऊ नका, त्याचा तुम्हाला त्रास होऊ शकतो. मान, पाठ, डोकं आणि डोळे यांच्याकडे लक्ष द्या. जेव्हा तुम्हाला वाटत असेल तेव्हा मदत नक्की मागा. जगात अजून मदत करणारी चांगली माणसं आहेत यावर विश्वास ठेवा!

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी जलद गतीचा आहे. तुमच्या कामात तुम्हाला नवीन संकल्पना सुचतील. थोडे मतभेद आणि वादविवाद देखील संभवतात पण एकुणात परिस्थीत चांगली राहील. इतरांसमोर तुमचं बुद्धीचातुर्य उठून दिसेल. तुम्हाला हवी असलेली बातमी मिळेल, किंवा हवी असलेली व्यक्ती भेटेल. एखादा प्रवास घडेल. या आठवड्यात तुम्ही अतिशय प्रामाणिकपणा जपण्याची गरज आहे. रोखठोक वागा, भावनांना बळी पडू नका. संवाद कौशल्यात सुधारणा करा. वाचन, लेखन यासारख्या गोष्टींत मन रमवा. फक्त लहान तोंडी मोठा घास घेऊ नका!

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जायुक्त असणार आहे. तुम्ही तुमच्या ध्येयपूर्तीसाठी एक पाऊल पुढे टाकू शकणार आहात. झटपट घडामोडी घडू शकतात. तुमच्या नोकरीत, व्यवसायात किंवा घरातील आवडीच्या कामात एक प्रकारे नवीन चांगली चालना मिळेल. अडथळे येतील पण त्यावर तुम्ही कुशलतेने मात करू शकाल. काही प्रवास घडू शकतात त्यातून तुम्हाला आनंद होईल. या आठवड्यात तुम्ही तुम्हाला जे साध्य करायचं आहे त्यावर एकाग्रपणे काम करा. लक्ष विचलित होऊ देऊ नका. इतरांना देखील घेऊन पुढे चाला. आळस अजिबात नको.

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी खूप काम आणि कष्ट करण्याचा असणार आहे. जे करत आहात त्यात तुम्हाला प्राविण्य मिळेल. पण तुम्हाला हवा तसा प्रतिसाद मिळणार नाही. तरीही तुम्ही संपन्न आणि आनंदी रहाल. तुमच्या कुठल्यातरी भौतिक, आर्थिक ध्येयाच्या दिशेने चांगली वाटचाल कराल. काम परिपूर्णतेकडे जाईल. या आठवड्यात तुम्हाला बाकी कसलाही विचार न करता पूर्ण लक्ष तुमच्या कामाच्या किंवा व्यवसायाच्या ठिकाणी ठेवायचे आहे. वैयक्तिक गोष्टींत अडकू नका. चुका दुरुस्त करून, सुधारणा करा. स्वावलंबी व्हा!

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी आनंद आणि उमेद घेऊन येत आहे. सध्या सुरू असलेल्या त्रासातून थोडा दिलासा मिळणार आहे. जखमेवर फुंकर घालणारा हा काळ आहे. तुम्ही जे कराल त्याचे सकारात्मक परिणाम दिसतील. ''अजि सोनियाचा दिनु, वर्षे अमृताचा घनु'' असा अनुभव येईल! या आठवड्यात तुम्ही जे करत आहात तेच अधिक चांगल्या भावनेने करायचे आहे. श्रद्धेने तुमचे काम करा. चांगुलपणावर विश्वास ठेवा. नीतीने आणि विवेकबुद्धी वागा. इतरांना जेवढी जमेल तेवढी मदत करा. अवघड परिस्थितीतही खचून जाऊ नका. स्वतः साठी वेळ काढा आणि जमेल ती उपासना करा.




## गांधी तत्त्वज्ञान केंद्रात नामविस्तार दिन उत्साहात साजरा

धुळे, दि.१४- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे येथे विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले.

याप्रसंगी स्थानिक सल्लागार समिती सदस्य पवन पोद्दार, अधिसभा सदस्य नितीन ठाकूर, केंद्राचे संचालक डॉ.संजय ढोडरे, वरिष्ठ सहाय्यक रोहिदास साळुंखे, कर्मचारी व अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



केंद्राचे संचालक डॉ. संजय ढोडरे यांनी या दिनाचे महत्त्व विशद करताना विद्यापीठाच्या वाटचालीचा आढावा घेतला. दि.११ऑगस्ट २०१८ रोजी पूर्वीच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नामविस्तार होऊन विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्यात आले. त्यादिवसापासून हा दिवस विद्यापीठ नामविस्तार दिवस म्हणून साजरा केला जातो. डॉ.ढोडरे यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्य क्षेत्रातील तसेच अहिराणी भाषेवरील योगदानावरही प्रकाश टाकला. सदर कार्यक्रमाचे आयोजन कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.शिवाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. डॉ.संजय ढोडरे यांनी संयोजन केले. रविदास साळुंखे, गणेश गवळी व निलेश जगताप यांनी परिश्रम घेतले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता.जि. धुळे येथिल सि.स.नं.१६५१ चे क्षेत्र १३२.१ चौ.मी., सत्ता प्रकार 'अ' यात बांधीव 'भावसार कॉम्पलेक्स' मधील बेसमेंट फ्लोअर चा बांधीव गाळा नं.बी ६ चे क्षेत्र ११.८० चौ.मी. बिल्टप एरिया यांसी षट: सिमा मंजुर बांधकाम नकाशा प्रमाणे येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत सौ.संगीता विश्वनाथ अग्रवाल, रा.११, राजवाडे नगर, चाळीसगांव रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, कर्ज, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:-१४/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
मो.नं.९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता.जि. धुळे येथील सि.स.नं.१६५१ चे क्षेत्र १३२.१ चौ.मी., सत्ता प्रकार 'अ' यात बांधीव 'भावसार कॉम्पलेक्स' मधील ग्राऊंड फ्लोअर चा बांधीव गाळा नं.जी ६ चे क्षेत्र ११.८० चौ.मी. बिल्टप एरिया. यांसी षट: सिमा मंजुर बांधकाम नकाशा प्रमाणे. येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत श्री.धर्मेंद्र राधेशाम अग्रवाल, रा.१२७२, गांधी पुतळ्या जवळ, आग्रा रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, कर्ज, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:-१४/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
मो.नं.९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील स. नं. ९४/१ यातील प्लॉट नं. ४२ चे क्षेत्र १५० चौ. मी. या पैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७५ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ४०, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : याच प्लॉट नं. ४२ पैकी भाग, उत्तरेस : प्लॉट नं. ४१, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) वंदना शालीग्राम पाटील, २) तुषार शालीग्राम साळुंखे दोघे रा. मोगलाई साक्री रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

धुळे दि. १४/०८/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- मौजे धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. ४०२/२अ+१ब+२क+२ड पैकी प्लॉट नं. ४५ चे एकूण क्षेत्र १८० चौ. मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ६९.७० चौ. मी. यास सि. स. नं. १२१५८ यात लोडबेरींग बांधीव घर नळ कनेक्शन इले. मीटरसह असे बांधीव घर तुम्हांस कायम खरेदी देण्याचा सौदा केला ती माझे मालकीचा बांधीव घर त्यासी चतु:सिमा मंजूर नकाशाप्रमाणे.

वर नमूद वर्णन केलेला घर/मिळकत ही अनिस अहेमद मोहम्मद युनुस अन्सारी रा. धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे ताबे उपभोगातील आहे. सदरची मिळकत आमचे अशिल यांना कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे व बयाणा अदा केलेला आहे. सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद घर/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील घर/मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वर नमूद घर/मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे. धुळे दि. १४/०८/२०२६

**ॲड. लखमीचंद अ. गुजर** ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं. ३३२६, मुल्लावाडा, धुळे मो. ९४२३४९३०८९




# धुळे महानगरपालिका, धुळे

बांधकाम विभाग- ई-निविदा सूचना क्र.७७ सन २०२५-२०२६

मा.आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे हे खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) structural engineers panel नेमणूक करणेसाठी Item Rate नुसार निविदा दर मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | EMPANELMENT OF THE CONSULTANT FOR THREE YEAR FOR VARIOUS DEVELOPMENT WORKS AND PROJECTS TO BE CARRIED OUT BY DHULE MUNICIPAL CORPORATION | २०,०००/- |

उपरोक्त निविदांबाबतंचा सविस्तर तपशिल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१८/०८/२०२६ सायं.१७.०५ वाजेपासून पहावयास मिळेल.

जा.क्र./धुमपा/बा.वि./६९/२०२६-२७
दिनांक- १४/०८/२०२६

उपायुक्त,
धुळे महानगरपालिका, धुळे


✻ धुळे दि.१४- शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत झाल्याने नागरीकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहरातील बहुसंख्य भागात आठ ते नऊ दिवसानंतर पाणी पुरवठा होत आहे. महापालिकेकडून पाणी पुरवठा योजनेची देखभाल होत नसल्याचे चित्र पुढे आले आहे. कारण, शहरातील काही भागात गढूळ पाणी पुरवठा होत आहे. मनपाने दाखल घ्यावी, अशी अपेक्षा आहे.



## जाहीर नोटीस

ॲड. एन. पी. अयाचित
प्रोसेस पेड
निशाणी नं. ६

**मे.२ रे सह दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर धुळे यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७३९/२०२६

विश्वेश्वर दलपतराव देवरे ...अर्जदार

विरुद्ध

अरुणा अभिमन पगार ....जाबदेणार

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार हे मयत सुशिला दलपतराव देवरे ह्या दि. १०/१२/२०१५ रोजी धुळे येथे मयत झाल्या व तसेच दलपत संपत देवरे हे दि. ०५/०४/२०१६ रोजी धुळे येथे झाले. त्यांचे कायदेशीर वारस विश्वेश्वर दलपतराव देवरे, विद्या दोधा अहिरे, वर्षा मधुकर पाटील, अरुणा अभिमन पगार हे कायदेशीर वारस आहे. म्हणून त्या संदर्भात त्यांना वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. त्याअर्थी ज्या कोणाला या बाबत हरकत असेल, अर्जदार मयताचे वारस नाहीत किंवा अर्जदारांशिवाय अन्य कोणी कायदेशीर वारस आहेत अशी माहिती असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अगर दि. ०२/०९/२०२६ चे आत मे. कोर्टात आपली लेखी किंवा तोंडी हरकत नोंदवावी. अन्यथा अर्जदार यांचे माहिती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे,दि. १६/०७/२६

आदेशावरुन

सही... कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय, व.स्तर धुळे (शिक्का)

सही... अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर धुळे




तहसिल कार्यालय, धुळे
(जन्म मृत्यू शाखा)

ई मेल : tahshildardhule99@gmail.com
दूरध्वनी क्र.. 02562-288721
क्रमांक/ज.मृ.नों/कावि/२७८/२०२६
दिनांक १४/०८/२०२६

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे न्यायालया अंतर्गत प्रसिद्धी नोटीस**

श्रीमती जोत्सना अनिल पाटील, पत्ता : सरवड ता. जि. धुळे ...अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सरवड, ता. जि. धुळे ....जाबदेणार

श्रीमती ज्योत्सना अनिल पाटील रा.सरवड ता. जि. धुळे यांनी इकडील कार्यालयास अर्ज करुन त्यांचा जन्म दि. ०८/०६/२००७ रोजी मौजे सरवड ता. जि. धुळे येथे झाला असून संबंधितांची जन्माची नोंद ग्राम पंचायत कार्यालय सरवड ता. जि. धुळे येथे नसल्याने व सदरील जन्म हा एक वर्षा पुढील असल्याने महाराष्ट्र जन्म नोंद अधिनियम १९६९ चे कलम १३ पोट कलम ३ अन्वये जन्म नोंद होणे कामी जन्म आदेश व तसे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी वरील प्रमाणे अर्जात नमूद केलेल्या माहिती विषयी कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा खुलासा द्यावयाचा/मांडावयाचा असल्यास त्यांनी दि.०७/०९/२०२६ रोजी ठीक सकाळी ११.०० वा. पावेतो तहसिल कार्यालय, धुळे ग्रामीण (जन्म मृत्यू नोंद शाखा) येथे स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकती गृहीत धरण्यात येणार नाही व सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे सही शिक्क्यानिशी दि. १४/०८/२०२६ रोजी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ : धुळे दि. १४/०८/२०२६

(शिक्का)

सही...
तहसिलदार धुळे ग्रामीण




## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने आमचे अशिल समाधान परमेश्वर पाटील रा. देवपूर धुळे ता. जि. धुळे यांचे तर्फे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी वलवाडी येथील गट क्रमांक ८९/१अ/१ब/१क/१ड पैकी प्लॉट नं. ४२ त्यासी मधील क्षेत्र ७५ चौरस मीटर प्लॉट हा भारती मानसिंग गिरासे व ८८.३० चौरस मीटर प्लॉट हा जयश्री विरपाल गिरासे व विरपालसिंग सुभाषसिंग गिरासे असे यांच्या नावावर आहे. असे एकूण क्षेत्र १६३.३० चौरस मीटर असे दोन्हीही प्लॉट ला एकत्रीत आकार रुपये १६.३३ पैसे चतु:सिमा मंजूर लेआउट प्रमाणे यापुढे सदर मिळकत असे संबोंधले आहे.

सदर मिळकत ही भारती मानसिंग गिरासे व जयश्री विरपाल गिरासे व विरपालसिंग सुभाषसिंग गिरासे यांच्या मालकीचा व ताबे उपभोगातील आहे. सदर मिळकत ही भारती मानसिंग गिरासे व जयश्री विरपाल गिरासे व विरपालसिंग सुभाषसिंग गिरासे यांनी कायमस्वरुपी विक्री काढली आहे.सदर मिळकत आमच्या अशिलांना कायम खरेदीने घ्यायची असल्याने त्यांनी वरील तीनही जणांशी सौदा पावती केली आहे. बयाणा म्हणून काही रक्कम दिली आहे व लवकरच आमचे अशिल कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहे.

तरी सर्वांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकती संबंधी कोणाचाही काहीही हक्क, हितसंबंध, बोजा, तारण, गहाणसौदा, भाडेपट्टा, कर्ज लिज, खावटी हक्क, बक्षिस, दान, जनरल मुखत्यारपत्र, अदला बदल वगैरे वा कुठल्याही व कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत संपर्क करुन हरकत नोंदवावी. व सदर मिळकती संबंधीचे मुळ कागदपत्र दाखवून त्यांचे समाधान करावे. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निर्बोज आहे असे समजून आमचे अशिल पुढील कायम खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर कोणाचीही कोणतीही तक्रार व हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

धुळे दि. १४/०८/२०२६

**ॲड.अे. आर. साळे,** मो. ८७८८५३७४८२
७७, सुशिल नगर, नवजीवन ब्लड बँक मागे, धुळे ता. जि. धुळे..

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना विशेष करून शेख अरमान शेख अल्लु मन्यार, रा.अंचाळे रोड, मुकटी, ता.जि.धुळे. यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील धुळे म.न.पा. हद्दीतील स.नं.४०३ पैकी प्लॉट नं.११७, चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ७५ चौ.मी. ८०७ चौ.फुट सि.स.नं.१२३४१ यात लोडबेरींगचे दुमजली बांधीव घर, नळ कनेक्शन, वीज कनेक्शनसह अशी मिळकत त्यांची चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे.

वर नमुद मिळकतीचे मुळ मालक आमचे पक्षकार शेख आरिफोद्दीन रियाजोद्दीन, रा.शिवाजी नगर, नुर मस्जिदजवळ, धुळे. यांची मालकी हक्कातील व ताबे उपभोगातील असून त्यांनी शेख अरमान शेख अल्लु मन्यार, रा. धुळे. यांच्याशी दि.१३/०४/२०२६ रोजी सौदा पावती केलेली आहे अशी खरीवस्तुस्थिती होती व आहे. परंतु नामे शेख अरमान शेख अल्लु मन्यार, यांनी दि.१३/०४/२०२६ रोजीचा ठरलेल्या सौदया प्रमाणे आमचे पक्षकार यांना रक्कम दिलेली नाही व अटी व शर्तीचा भंग केलेला आहे. म्हणून आमचे पक्षकार यांनी सदरचा सौदा रद्दबातल केलेला आहे व त्याअनुषंगाने शेख अरमान शेख अल्लु मन्यार यांना नोटीस देखील पाठविलेली आहे म्हणून जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीबाबत नामे शेख अरमान शेख अल्लु मन्यार, यांच्याशी कोणीही विक्री व्यवहार, सौदे करार, भरणा पावती, करु नये, केल्यास तो आमचे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच आज पासून आमचे पक्षकार हे वर नमूद मिळकतीचा सौदा व व्यवहार दुसरा व्यक्तीशी करण्यास मोकळे झाले आहे. याची सर्वांनी नोद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दिनांक:-१४/०८/२०२६.
जाहिर नोटीस देणारतर्फे

**ॲड.परवेज निसार तांबोळी**
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे.
मो.नं.७०२०३८१३९४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील स.नं.१७२/१ यापैकी प्लॉट नं.१६ एकूण क्षेत्र २०६.०० चौ.मी. बखळ प्लॉट यासी लागू चतु:सिमा

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- | स.नं.१७२/१, |
| पश्चिमेस- | प्लॉट नं.१५, |
| दक्षिणेस- | ९ मी रस्ता, |
| उत्तरेस- | वलवाडी येथील स.नं.१९ |

सदर मिळकत मुकेश मोहन बारी रा.घर नं.२६६४/ब, गल्ली नं.४/५ ची बोळ, चैनी रोड, धुळे-४२४००१ यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यानी उपरोक्त मिळकत कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकत लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत इतर सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर मिळकती संबधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण- धुळे, दिनांक:-१४/०८/२०२६.

**ॲड.चेतन महादु यादव**
पत्ता- सि.स.नं.२५९७/अ,
श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५,
मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१
मो.नं.९६८९१२४६९२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता.जि.धुळे येथील धुळे म.न.पा. हद्दीतील स.क्र. ६७/२/ब पैकी प्लॉट क्र.११ चे एकूण क्षेत्र २०२.५० चौ.मी. यास लागू विस्तारीत सि.स.नं.३३८१ चे क्षेत्र २४७.५० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ९३.०० चौ.मी. यात बांधीव मिळकत यासी मापे व चतु:सिमा मंजुर अभिन्यास नकाशा प्रमाणे

येणे प्रमाणे वर्णनाची आतील मिळकत अनिल अनंत बुवा यांचे मालकीची असून त्यांनी दिनांक १०/०४/२०२६ रोजी. मा.दुय्यम निंबधक सो. धुळे-१ यांचे कार्यालयातील हक्कसोडपत्र दस्त क्र.२४५६/२०२६ अन्वये सौ.छाया राजेंद्र मुळे व इतर यांनी विनामोबदला हक्कसोड पत्र केले तेव्हा पासून श्री.अनिल अनंत बुवा यांचे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकत विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिल यांच्याशी सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉटवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्यावर मिळकती संबधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण- धुळे, दिनांक:-१४/०८/२०२६.

**ॲड.चेतन महादु यादव**
पत्ता- सि.स.नं.२५९७/अ,
श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५,
मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१
मो.नं.९६८९१२४६९२




# शिरपूर वरवाडे नगरपरिषद

ता. शिरपूर, जि. धुळे, पिन क्र.४२५४०५.
फोन नंबर २५५०४२/२५५७४२ (०२५६३), e-mail: shirpurnagarparishad@gmail.com
जा.क्र./बांध.निविदा/२०४१/२०२६-२७ बांधकाम विभाग दि.१४/०८/२०२६

## जाहीर निविदा सूचना

निविदा सूचना क्र.०६/२०२६

शिरपूर-वरवाडे नगर परिषद, शिरपूर यांच्या मालकीच्या शॉपिंग सेंटर, शाळा, कार्यालयीन व इतर इमारतींचे Structural Stability Assessment / Structural Audit, तसेच आवश्यक RCC Structural Design & Drawing करून देण्यासाठी पात्र व अनुभवी Structural Engineer /Structural Consultant / Consultancy Firm यांचेकडून दरपत्रके/निविदा मागविण्यात येत आहेत.

-: कामाचे स्वरूप :-

१. नवीन इमारतींचे RCC Structural Design – प्रती चौ.मी. दर
२. विद्यमान इमारतींचे Structural Audit करून Stability Certificate देणे- प्रती चौ.मी. दर
३. रस्ते, भुयारी गटार, संरक्षण भिंत इत्यादींसाठी RCC Structural Design & Drawing लम्सम दर

-: निविदा कार्यक्रम :-

१. निविदा अर्ज विक्री : दि.१५/०८/२०२६ ते दि.२२/०८/२०२६ (कार्यालयीन वेळेत).
२. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत : दि.२२/०८/२०२६ रोजी संध्या. ०५.०० वाजेपर्यंत.
३. निविदा उघडण्याची तारीख : दि.२४/०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता, नगर परिषद कार्यालय, शिरपूर येथे.


-: अटी व शर्ती :-

१. संबंधित नोंदणी प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रता व अनुभवाची कागदपत्रे निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

दिनांक : १४/०८/२०२६, स्थळ : शिरपूर

(प्रशांत सरोदे) मुख्याधिकारी
(वासुदेव देवरे) बांधकाम सभापती
(संगीता देवरे) उपाध्यक्ष
(चिंतनभाई पटेल) अध्यक्ष





पान १ वरुन

## आजपासून दामिनी पथकांची स्थापना

सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. दामिनी पथकाच्या सततच्या गस्तीमुळे टवाळखोर, छेडछाड करणारे आणि असामाजिक घटकांवर धाक निर्माण होईल. आपत्कालीन परिस्थतीत किंवा अनुचित घटना घडत असतांना दामिनी पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचून मदत करणे सुलभ होईल.

दामिनी पथक कार्यरत

शाळा, महाविद्यालय, बस स्थानक, रेल्वे स्टेशन, उद्याने, बाजारपेठा आणि निर्जन रस्ते अशा संवेदनशिल सार्वजनिक ठिकाणी नियमित गस्त करतील. विद्यार्थिनी व महिलांची छेड काढणाऱ्या टवाळखोरांना पकडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे किंवा योग्य ती समज देणे. शाळा, कॉलेज मधील मुलींना सुरक्षिततेचे धडे देणे, गुड टच, बॅंड टच विषयी जागृती करणे. कौटुंबिक व सामाजिक समस्यांमध्ये पीडित महिलांचे समुपदेशन करणे, त्यांना योग्य ते कायदेशीर मार्गदर्शन व मदत मिळवून देणे. महिला सुरक्षेसाठी उपलब्ध असणारे हेल्पलाईन नंबर (उदा. डायल ११२) आणि सुरक्षितता ॲप्स बाबत महिलांमध्ये जागृती निर्माण करणे. गर्दीचे सण-उत्सव, मेळावे किंवा आंदोलनांच्या विशेष प्रसंगी महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष गस्त करणे.

## पो.नि.विनोद पाटील यांना राष्ट्रपती पदक

असणाऱ्या गुप्त वार्ता विभागाचे निरिक्षक विनोद पाटील यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहे. यापुर्वी २०१९ मध्ये विनोद पाटील यांना पोलिस महासंचालकांकडून पदक जाहीर करून सन्मानीत करण्यात आले होते. विशेष म्हणजे विनोद पाटील यांचे वडिल निवृत्त पोलिस उपअधीक्षक प्रभाकर पाटील यांना १९८२ मध्ये गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल आणि १९८५ मध्ये वैशिष्ट्यपूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपती पदकाने सन्मानीत करण्यात आले होते.

## कपाट दुरुस्तीच्या बहाण्याने चोरी

येथुन विधी संघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेत विचारपुस केली. पथकाने त्याची बॅगची तपासणी केली असता, तिच्यात सोने चांदीचे दागिने मिळाले, दागिने बाबत विचारपूस केली असता, त्याचा काका पातालसिंग शिकलीकर, (रा. एकतानगर, नालवे रोड, नंदुरबार) (मरार) याने अंजनविहिरे गावातुन दिवसा चोरी १५ हजारांचे ५ ग्रॅफ कानातील सोन्याचे टोंगल, जोड, १० हजारांचे सोन्याचे गळयातील पॅडल, १० हजारांची सोन्याची अंगठी, चांदीची चाळ, कडे, साखळया, चांदीचा मुकुट तसेच बॅग, कानस, हातोडी, पकड व चावीचा गुच्छा (चोरी करण्यासाठीचे साहित्य) असा एकूण ४९ हजारांचा मुद्देमल हस्तगत केला.संशयित पातालसिंग शिकलीकर बेपत्ता असून त्याचा शोध घेण्यात येत आहे. त्याच्यावर शिरपूर, नंदुरबार येथील पोलीस ठाण्यात यापूर्वीच गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, उपनिरीक्षक अमित माळी, हवालदार प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, विनायक खैरनार, कफ्लेश सुर्यवंशी, हर्षल चौधरी, राहुल गिरी, अफेल पाटील व अफेल ज्ञाधव यांनी कारवाई केली.

## ४८० किलो गांजा जप्त

मदन भरतसिंग पावरा (रा. टिटवापाणी, ता. शिरपूर) आणि अमित थावच्या पावरा (रा. चिलारे, ता. शिरपूर) यांनी कपाशी पिकामध्ये मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गांजासदृश अंमली पदार्थाची बेकायदा लागवड केल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पोलिसांनी वनविभागाचे दोन शासकीय पंच, वजनकाटाधारक, छायाचित्रकार तसेच राजपत्रित अधिकारी यांच्या उपस्थितीत छापा टाकला. या कारवाईत मदन पावरा याच्या कथित वनजमिनीवरील शेतातून ३०० किलो गांजासदृश पदार्थ, तर अमित पावरा याच्या शेतातून १८० किलो गांजासदृश पदार्थ जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे २४ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणी शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३३/२०२६ अन्वये गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमांतर्गत कलम ८(क),२० (अ)(आय) व २८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांची चाहूल लागताच दोन्ही संशयित आरोपी शेतातून पसार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे अतिदुर्गम भागात वनजमिनीवर सुरू असलेल्या बेकायदा गांजा लागवडीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विश्वास आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, पोलीस उपनिरीक्षक मनोज कचरे, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद पवार तसेच पोलीस अंमलदारांनी कारवाईत सहभाग घेतला.

## मतदारांनी १७ ऑगस्टपर्यंत गणना

होणार नाही, त्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत. त्यामुळे सर्व मतदारांनी आपल्या मतदान भागातील बीएलओशी संपर्क साधून तातडीने गणना प्रपत्र भरून जमा करावे. मतदार यादीत नाव कायम राहण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराने विहित मुदतीत गणना प्रपत्र सादर करणे आवश्यक आहे. असेही आवाहन धुळे शहर सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा अपर तहसीलदार श्रीमती हिंगे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

## आदिवासी जमीन प्रकरणात..

आला आहे. विजय विठ्ठल देवरे यांनी हिरामन भुऱ्या भिल यांच्या वतीने विठ्ठल झिपरू पाटील यांना जमीन विकल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर फेरफार नोंद क्रमांक नुसार संस्थेच्या वतीने मुख्य प्रवर्तक विठ्ठल झिपरू पाटील यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर लागल्याचे निवेदनात म्हटले आहे.या व्यवहारामुळे आदिवासी जमीनधारक भूमिहीन झाले असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मिळणारा जमिनीचा मोबदला प्रत्यक्षात मिळाला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच जनरल पॉवर ऑफ ॲटर्नीचा वापर करून खरेदीखत करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. आदिवासी जमीनधारक अशिक्षित असल्याचा गैरफायदा घेत बिगर आदिवासी व्यक्ती आणि तत्कालीन अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संगनमताने फसवणूक केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.दरम्यान, विठ्ठल झिपरू पाटील यांनी जमिनीचा ताबा व मारहाणीच्या संदर्भात धुळे दिवाणी न्यायालयात रे. मू. नं. ३११/२०१७ अन्वये दावा दाखल केल्याचे निवेदनात नमूद आहे. तसेच शेड्युल ट्राईब रेस्टोरेशन ॲक्ट, १९७४ अन्वये अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्या न्यायालयात आरटीएस क्र. ५७०/२०२६ अंतर्गत अपील दाखल करण्यात आले असून, त्याची अंतिम सुनावणी १७ ऑगस्ट २०२६ रोजी होणार असल्याचे सांगण्यात आले.दिवाणी न्यायालयातील दावा आणि अपर विभागीय आयुक्तांच्या न्यायालयातील प्रकरणातील मुद्दे वेगवेगळे असल्याने दोन्ही न्यायालयांचे अधिकारक्षेत्र स्वतंत्र असल्याचा दावा निवेदनकर्त्यांनी केला आहे. आदिवासी जमिनीच्या मालकी हक्काबाबत तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या फेब्रुवारी रोजीच्या आदेशाविरोधातील कार्यवाहीबाबत संबंधित महसूल न्यायालयाला अधिकार असल्याचे त्यांनी नमूद केले.अधिनस्थ अधिकारी व कर्मचारी चुकीची किंवा अपूर्ण माहिती देण्याची शक्यता असल्याने अहवाल तयार करताना विशेष दक्षता घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. मूळ अभिलेख, महसूल नोंदी, संबंधित कायदेशीर तरतुदी आणि प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा सखोल विचार करूनच अहवाल तयार करावा. कोणत्याही पक्षाच्या प्रभावाखाली न जाता न्याय, निष्पक्षता आणि संवैधानिक मूल्यांचे पालन करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.निवेदन देताना राम भील, शाम भील, गोकुळ भील, राजन वाघ, संतोष मोरे, मनोज ढिवरे, पिंटु भील, चैत्राम मोरे, राहुल मोरे, सुमनबाई भील, आशा भील, लताबाई मोरे, संदीप भील, विजय भील आदी नागरिक उपस्थित होते.



## पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेवर व्याख्यानाला प्रतिसाद

**शिरपूर, दि.१४ - आदिवासी युवती विकास मंचाच्या वतीने जागतिक आदिवासी दिनानिमित्त एच.आर. पटेल कला व विज्ञान महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा व क्रीडा क्षेत्रातील संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.**

प्रभारी प्राचार्य डॉ. गजानन पाटील व प्रमुख पाहुणे सुभाष पावरा यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थिनींनी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा व क्रीडा क्षेत्रातील उपलब्ध संधींचा लाभ घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा, असे प्रतिपादन अमरीशभाई आर. पटेल अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक तथा प्रमुख वक्ते सुभाष पावरा यांनी केले. त्यांनी विद्यार्थिनींना विविध क्रीडा प्रकारांचे महत्त्व, क्रीडा क्षेत्रातील उपलब्ध संधी तसेच खेळातील सातत्य, मेहनत व जिद्द याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी एमपीएससी, यूपीएससी व सरळ सेवा यांसह विविध स्पर्धा परीक्षांची तयारी, अभ्यासाचे नियोजन आणि उपलब्ध संधींचा योग्य वापर याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पावरा लक्ष्मी राजाराम, पावरा सलोनी कांतीलाल, वसावे निकिता रणजित, पावरा मंजू देविदास, पावरा शितल कैलास या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. आदिवासी युवती विकास मंचाच्या वतीने क्रीडा क्षेत्रात यशस्वी कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींचा प्रमुख पाहुणे सुभाष पावरा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थिनींच्या कामगिरीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रभारी प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांनी विद्यार्थिनींनी केवळ पदवीपुरते शिक्षण मर्यादित न ठेवता स्पर्धा परीक्षा, क्रीडा व अन्य क्षेत्रांतील संधींचा शोध घ्यावा, असे आवाहन केले. विद्यार्थिनींनी आपल्या क्षमता ओळखून ध्येय निश्चित करावे आणि त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयतक करावेत, असेही त्यांनी सांगितले.

प्रा. केशव तडवी यांनी प्रास्ताविकातून आदिवासी युवती विकास मंचाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, विविध उपक्रम तसेच आदिवासी युवतींच्या सर्वांगीण विकासासाठी मंचाची भूमिका याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री चव्हाण यांनी केले.

यावेळी डॉ. मनीषा चौधरी, डॉ. इंदिरा गिरासे, डॉ. विद्या पाटील, समितीचे सदस्य प्रा. अंकेश पावरा, प्रा. गुलाबसिंग वळवी यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## शहाद्यात भव्य तिरंगा रॅली

शहादा,दि.१४(का.प्र.)- शहादा शहरात व्हॉलंटरी महिला मंडळ शाळा, लाडकोबाई माध्यमिक शाळा व विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य तिरंगा रॅलीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. हातात राष्ट्रध्वज घेतलेल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर दिलेल्या घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते. या रॅलीमुळे शहाद्यात सर्वत्र देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.तिरंगा रॅलीची सुरुवात व्हॉलंटरी महिला मंडळ शाळेपासून करण्यात आली. तेथून निघालेली ही रॅली जनता चौक, नगरपालिका, गांधी पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, स्टेट बँक आणि विकास हायस्कूल या प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा शाळेच्या परिसरात पोहोचली. या प्रवासात विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेऊन भारतमातेचा जयघोष करत विविध देशभक्तीपर घोषणा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे रॅलीत विशेष उत्साह पाहायला मिळाला.

पान १ वरुन

## जबरी चोरीसह घरफोडी करणाऱ्या

घेण्यात येत आहे. गुरुचरणसिंग शिकलकर याच्याविरुध्द यापुर्वीही गुन्हे दाखल आहेत.पोलीस अधीक्षक धुळे विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, उपनिरीक्षक अमरजित मोरे, अमित माळी, हवालदार योगेश चव्हाण, प्रल्हाद वाघ, दिनेश परदेशी, तुषार सुर्यवंशी, सतिष जाधव, हेमंत बोरसे, मच्छिंद्र पाटील, महेंद्र सपकाळ, अमोल पाटील, सुनिल पाटील, अमोल जाधव यांनी कारवाई केली.

## दुर्घटनेत सात जण ठार

अडकले आहेत. बचाव दलाने चौदा लोकांना सुरक्षित बाहेर काढले आहे.

या वाचवलेल्या लोकांपैकी तेरा जखमींवर गोपेश्वर येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर, एका गंभीर जखमी व्यक्तीला श्रीनगर येथील उच्च केंद्रात पाठवण्यात आले आहे. बोगद्यात पाणी आणि ढिगारा आल्यामुळे बचावकार्य आव्हानात्मक बनले आहे. अडकलेल्या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी बचाव पथके प्रयत्न करत आहेत. प्रशासनासोबतच एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि लष्कराची पथके घटनास्थळी तैनात आहेत. बोगद्यात अडकलेल्या लोकांच्या बचावासाठी लष्कराचे पथकही तैनात करण्यात आले आहे. मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी घटनास्थळी पोहोचले आहेत आणि ते स्वत: बोगद्यात जाऊन मदत आणि बचाव कार्याची पाहणी करत आहेत. यानंतर मुख्यमंत्री गोपेश्वर येथील जिल्हा रुग्णालयात जातील, जिथे ते जखमींची भेट घेऊन त्यांची विचारपूस करतील.

## पोलीस,अग्निशमन ३०१ जवानांना शौर्य पदके

शोभा दत्ता, मनोज बॅनर्जी, गिन्नी राणा, संजय कुमार सामल, रमेश चंद आणि मदनलाल धिमान यांचा समावेश आहे. या पुरस्कारांमध्ये पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, उपअधीक्षक आणि सहाय्यक उपनिरीक्षक पदांवरील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सीबीआयच्या विविध युनिटमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी तपास, कायदेशीर कामकाज, तांत्रिक सेवा, प्रशासकीय कामकाज आणि क्षेत्रीय स्तरावर दिलेल्या योगदानाची दखल घेत हा सन्मान करण्यात आला आहे. शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि उत्कृष्ट सेवेसाठी देण्यात आलेल्या या पदकांमुळे देशाच्या सुरक्षेसाठी आणि नागरिकांच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या जवानांच्या योगदानाचा गौरव झाला आहे.

## एल.सी.बी.ने जबरी चोरीसह घरफोडी

कुणाल कानकाटे, विधानसभा संघटक चंद्रकांत देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नवनियुक्त विधानसभा संपर्क प्रमुख संजय गुजर यांचा तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात येणार असून तालुक्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, बुथ स्तरावरील यंत्रणा सक्षम करणे, रिक्त पदांवर सक्षम पदाधिकाऱ्यांना जबाबदारी निश्चित करणे, हा प्रमुख उद्देश बैठकीचा आहे. सदर बैठकीस साक्री व पिंपळनेर तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तालुका प्रमुख चंद्रकांत देसले (साक्री), तुषार गवळी (पिंपळनेर), साक्री शहर प्रमुख हिंमत सोनवणे, पिंपळनेर शहर प्रमुख अतुल चौधरी, भुपेश शहा, प्रकाश पाटील, प्रविण वाणी, जयप्रकाश भामरे, पंजाबराव गांगुर्डे, नानु पगारे, दिपक वाणी, आप्पा भरत जोशी, रमेश शेवाळे, दत्तात्रय गुरव, वैभव भिंगारे, केशव शिंदे, भुषण महाजन, तानाजी कारंडे, बाबुशेठ टाटीया, विश्वास मुजगे, मनोज खैरनार, मयुर नांद्रे, चिंतामण ठाकरे, अलकाताई जाधव, हर्षल सोनवणे, राकेश जैन, जितेंद्र जैन, शिक्षक सेनेचे अशोक सोनवणे यांनी केले आहे.

## शाळा-महाविद्यालयांत देशभक्तीपर कार्यक्रम

शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे कौतुक केले व त्यांचे अभिनंदन केले. तसेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा अभियानात स्वयंस्फूर्तीने दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे सांगत, देशप्रेमाची ही ज्योत प्रत्येकाच्या मनात सदैव तेवत राहावी, असे आवाहन त्यांनी केले. मनपाच्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि तिरंग्याविषयीचा अभिमान अधिक दृढ होत असून, हर घर तिरंगा अभियानाला नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## फरशी पुलावरील वाहतुक १९ ऑगस्टपर्यंत बंद

धुळे, दि.१४- धुळे शहरातील पंचमुखी मारुती मंदिर ट्रस्ट आयोजक यांनी श्रावणमासानिमित्ताने पंचमुखी हनुमान मंदिरात महारुद महापुजा व शोभा यात्रा आयोजित केली असल्याने १५ ते १९ ऑगस्ट, २०२६ दरम्यान पंचमुखी हनुमान मंदिर, नदी किनारी या मार्गावरील वाहतुक तात्पुरती बंद करण्यात येत असल्याची अधिसूचना जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी निर्गमित केली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब) द्वारे प्राप्त अधिकाराचा वापर करुन फरशी पुलावरील वाहतुक १५ ते १९ ऑगस्ट, २०२६ पावेतो सकाळी ९.०० ते सायंकाळी २०.०० वाजेपर्यंत बंद करण्यात येत आहे. या काळात या मार्गावरुन येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनधारकांनी गणपती पुल किंवा वीर सावरकर पुतळया जवळील लहान पुलाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

१६ वे पुण्यस्मरण



कालकथित दलितमित्र आप्पासाहेब उर्फ
निर्गुण वजीर रामराजे
(निर्वाण - १५ ऑगस्ट २०१०)
*आपले शोकाकुल*
डॉ. नागसेन एन. रामराजे (एम्.डी.)
डॉ. सुषमा एन. रामराजे (एम्.डी.)
चि. हर्षवर्धन एन. रामराजे
समस्त रामराजे कुटुंब

**विकणे आहे**
वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१)कॉम्प्युटर ऑपरेटर अकाऊन्टंट
२) सेल्समन बाहेर गावांसाठी
३) मदतनीस
-: संपर्क :-
संजय मेडिकल्स
गल्ली नं. २ धुळे

**पाहिजेत**
यश दाताच्या दवाखान्यात काम करण्यासाठी पुर्णवेळ/अर्धवेळ कंपाउंडर पाहिजे
६ वी गल्ली H.D.F.C. बँकेच्या समोरील गल्लीत
भेटण्याची वेळ दुपारी १२।। ते २
संध्या. ६।। ते ८

**पाहिजेत**
अनुभवी स्टाफ भरणे आहे.
१. आर.एम.ओ. (MBBS/BAMS/BHMS/BUMS)- २
२. कॉम्प्युटर ऑपरेटर- २
३. नर्सिंग स्टाफ (सिस्टर/ब्रदर)-४
४. रिसेप्शनिस्ट- २
५. वॉर्डबॉय- २
६. वॉचमन- २
अर्जासह समक्ष भेटणे वेळ दुपारी १ ते ३
निरायम हॉस्पिटल
व श्वास क्रिटिकल केअर
व सिटी स्कॅन सेंटर, ८० फुट रोड, धुळे

**पाहिजेत**
हुशार व अनुभवी सेल्स मैंन पाहिजे. ॲण्ड अकाऊन्टंट पाहिजे
Tally Oprater
-: संपर्क :-
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं. २, मुल्लावाडा रोड, अकबर चौक, धुळे
मो. 9422286958
7350148955

**भाड्याने/विकणे**
शैक्षणिक क्लासेस चालू असलेली, 6000 Sq.feet चांगले बांधकाम असलेली जागा भाड्याने अथवा क्लासेस सहित विकणे आहे.
-: संपर्क :-
8055401841

**पाहिजेत**
रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिल्या जातील.
अपोलो गारमेन्ट
गरुड मैदान कॉम्प्लेक्स, साक्रीरोड, धुळे
7498748799

**ड्रायव्हर पाहिजे**
राजवाडे संशोधन मंडळात आकर्षक वेतनावर, अनुभवी ड्रायव्हर कम शिपाई त्वरीत पाहिजे उमेदवारांनी अर्जासह संपर्क साधावा.
-: संपर्क :-
राजवाडे मंडळ, धुळे
9511836404

**फ्लॅट भाड्याने देणे**
2 BHK फ्लॅट व 1 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
इंडियन बँकच्या वरती जुनी मर्चंट बँक शेजारी ग.नं.६, धुळे.
-: संपर्क :-
9823074633

**ब्राम्हण पाहिजे**
मंदिराच्या दैनंदिन पूजेसाठी ब्राम्हण पाहिजे,
वेळ सकाळी ६ ते १२, सायं. ४ ते ८
भेटण्याची वेळ सायं. ५ ते ६
-: संपर्क :-
श्री. जलाराम मंदिर
नटराज टॉकीज मागे, धुळे

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०